POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-३१७ ● मुंबई, शुक्रवार, १९ जून २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

के. के. वाघ वरिष्ठ महाविद्यालय नाशिक 'थॅलेसेमियामुक्त महाराष्ट्र' अभियानाबाबत सकारात्मक चर्चा

आश्रय सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक ट्रस्टच्या उपक्रमांना चालना







या प्रसंगी के.के.वाघ संस्थेचे कॅम्पस समन्वयक व विश्वस्त डॉ. व्ही. एम. सेवालीकर, प्राचार्य डॉ. पी. व्ही. रसाळ, उपप्राचार्य डॉ. अनुराधा नांदुरकर, कार्यक्रम समन्वयक व विज्ञान विभाग प्रमुख प्रा. अर्चना कोते, संगणक व विज्ञान विभाग प्रमुख डॉ. अर्चना बेंडाळे, तसेच डॉ. वर्षा मिस्त्री, डॉ. शारदा पाटील, प्रा. तृसी जोशी, प्रा. दामिनी करसाळे, प्रा. संजना चव्हाण आणि डॉ. मयुर उशीर आदी मान्यवर उपस्थित होते.

■नाशिक। प्रतिनिधी,

राज्यात **'थॅलेसेमिया मुक्त महाराष्ट्र'** घडविण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या **आश्रय सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक ट्रस्ट आणि के. के. वाघ वरिष्ठ महाविद्यालय**, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने आगामी शैक्षणिक वर्षात विविध आरोग्य व जनजागृतीपर उपक्रम राबविण्याबाबत महत्त्वपूर्ण चर्चा करण्यात आली.

यासाठी आश्रय ट्रस्टचे आरोग्य विभाग सचिव **प्रा. प्रकाश पांगम** तसेच ट्रस्टचे सदस्य **डॉ. खैरनार आणि रवी कुलकर्णी** यांनी महाविद्यालयाला सदिच्छा भेट दिली. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांसाठी आरोग्य तपासणी, थॅलेसेमियाबाबत जनजागृती, रक्त तपासणी, महिलांसाठी आरोग्य व आहारविषयक मार्गदर्शन तसेच विविध कार्यशाळांचे आयोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

प्रा. प्रकाश पांगम यांनी थॅलेसेमियासारख्या आनुवंशिक आजाराच्या प्रतिबंधासाठी जनजागृती आणि वेळेवर रक्त तपासणीचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, आरोग्य जागरूकता आणि सकारात्मक जीवनमूल्ये रुजविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती दिली.

के.के वाघ शिक्षण संस्थेच्या विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि जनजागृती कार्यशाळांचे आयोजन करण्याचेही निश्चित करण्यात आले. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक ज्ञान मिळण्याबरोबरच थॅलेसेमिया निर्मूलनाच्या सामाजिक चळवळीत सक्रिय सहभाग घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

'थॅलेसेमिया मुक्त महाराष्ट्र' हे केवळ अभियान नसून निरोगी आणि सुदृढ भविष्यासाठीची सामाजिक चळवळ आहे. आश्रय सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक ट्रस्ट आणि के.के. वाघ वरिष्ठ महाविद्यालय यांचे हे संयुक्त प्रयत्न विद्यार्थ्यांच्या आरोग्य संवर्धनासह समाजात जनजागृती निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.

पुढील 24 तास उष्ण- दमट हवामानाचे

राज्यात पावसाळ्याच्या दिवसांत येणार उष्णतेची लाट

शेतकऱ्यांना मोठा फटका...

राज्यात मान्सूनच्या विलंबामुळे चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.. पुढील पाच दिवस मान्सूनचा पाऊस होण्याची कोणतीही शक्यता नसल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. अल निनो आणि आयओडी यांच्या प्रभावामुळे महाराष्ट्रात मान्सून सक्रिय होण्यास आणखी वेळ लागू शकतो, अशी माहिती हवामान विभागाचे शास्त्रज्ञ एस. डी. सानप यांनी दिली. मान्सून सर्वदूर पोहोचेपर्यंत शेतकऱ्यांनी पेरणी करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे सध्या राज्यात काही जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे पण तो मान्सून चा नसणार आहे. राज्यात गोंदिया, गडचिरोली, जळगाव, ब्रह्मपुरी इथं पारा 40 अंशांवर असून उर्वरित राज्यात मात्र हाच पारा चाळीशीखाली आहे. राज्यातील नीचांकी तापमानाची नोंद महाबळेश्वरमध्ये करण्यात आली असून, तिथं पारा 18.5 अंशांवर पोहोचला. एकिकडे राज्यात पावसानं ओढ दिलेली असतानाच दुसरीकडे जून महिनाअखेर आली तरीही उकाडा काही कमी झाला नसल्यानं आता हा उन्हाळा नेमका कुठवर टिकून राहतो, हाच चिंतातूर करणारा प्रश्न जो-तो विचारत आहे. हवामान विभागानं वर्तवलेल्या प्राथमिक अंदाजानुसार पुढील 24 तासांमध्ये मुंबई शहर आणि उपनगरांत पावसाच्या तुरळक सरी वगळता उर्वरित भागात मात्र उकाडा कायम असेल.

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक,

मुंबईसह कोकण किनारपट्टी क्षेत्र, मराठवाडा आणि विदर्भात प्रचंड प्रमाणात उकाडा सुरूच असून, अद्यापही हा उष्मा कमी होण्याचं नाव घेत नाहीय. ही परिस्थिती कायम असतानाच पश्चिम महाराष्ट्रावरही सध्या पावसाची अवकृपाच पाहायला मिळत आहे. त्यामुळं पुढील 24 तासांमध्ये हवामानाचं आणखी भीषण रुप पाहायला मिळेल असा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. राज्यातील अनेक भागातील पुढील काही दिवस उष्ण आणि दमट हवामानाचा प्रभाव कायम राहणार असून विदर्भ उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यात उष्णतेची लाट येण्याची शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तवली आहे दुसरीकडे कोकण मध्य महाराष्ट्र आणि विदभार्तील काही भागात मेघगर्जनेसह विजांच्या कडकडाटात हलक्या पावसाची शक्यताही हवामान विभागानं वर्तवली आहे. राजस्थानच्या पश्चिमेपासून पश्चिम बंगालच्या मैदानी क्षेत्रापर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा सक्रिय झाला असून, त्यामुळं तेलंगणा, ओडिशा, बिहार, झारखंड इथं मान्सूनच्या आगमनास अनुकूल स्थिती पाहायला मिळत आहे. मात्र, इथं अरबी समुद्रावरील मान्सूनच्या वाऱ्यांना मात्र प्रगतीची वाट सापडेनाशी झाली आहे. ज्यामुळं महाराष्ट्रातील मान्सूनचा प्रवास पहिल्या टप्प्यातच ठप्प झाला आहे. परिणामी आणखी आठवडाभरतरी राज्यात पावसाची प्रतीक्षा कायम असेल असाच प्राथमिक अंदाज यंत्रणांनी वर्तवला आहे.



नाशकात जून-जुलैत दर शनिवारी...

तर ऑगस्टमध्ये 2 दिवसाआड पाणीकपातीचा निर्णय



■नाशिक। प्रतिनिधी,

नाशिकमध्ये अखेर येत्या शनिवारपासून पाणीकपातीचा निर्णय लागू होणार आहे. राज्यात पावसाला झालेला उशिर आणि धरणांमधील पाणीसाठा यांचा विचार करता नाशिक महापालिकेने पाणीकपातीचा निर्णय घेतला आहे. महापालिकेने जून आणि जुलै या दोन महिन्यांसाठी सध्या तरी आठवड्यातून एक दिवस पाणी कपातीचा निर्णय घेतला आहे. नाशिकमध्ये दर शनिवारी पाणीकपात केली जाणार आहे. तसेच अल-निनोचा प्रभाव कायम राहिल्यास ऑगस्टमध्ये दोन दिवसाआड पाणी पुरवठा न करण्याचा निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे. अल-निनोच्या पार्श्वभूमीवर जलसंपदा विभागाचे सचिव एकनाथ डवले यांच्या पत्रानंतर महापालिकेने पाणी कपातीचा तडकाफडकी निर्णय घेतला आहे.

भारतीय हवामान विभागाने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार या वर्षी अल-निनो परीस्थितीचा प्रभाव राहाण्याची शक्यता आहे. त्यामुळे पर्जन्यमानात घट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. राज्यातील विविध धरणे जलाशय आणि इतर जलस्त्रोतांमधील उपलब्ध पाणी साठ्याचा विचार करता पिण्याच्या पाण्याचा गरजांना सर्वोच्या प्राधान्य देणे आवश्यक असल्याबाबतच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. भविष्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये यासाठी तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक असल्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत, अशी माहिती महापालिकेने प्रसिद्धीपत्रक जारी करत दिली आहे. त्यानुसार नाशिक शहराचा यापुढील जून व जुलै महीन्यातील प्रत्येक शनिवार पाणी पुरवठा होणार नाही. ऑगस्ट महिन्यात दोन दिवसाआड म्हणजेच 1, 4, 7, 10, 13, 16, 19, 22, 25, 28 व 31 ऑगस्ट 2026 रोजी पाणी पुरवठा होणार नाही, यांची नागरीकांनी नोंद घ्यावी आणि नाशिक महानगरपालिकेस सहकार्य करावे ही नम्र विनंती, असं महापालिकेने म्हटलं आहे.

'मी मराठीत बोलणार नाही, चल हट...'

मुंबई सेंट्रलवर रेल्वे कर्मचाऱ्याची अरेरावी... व्हिडीओ व्हायरल

मुंबईमध्ये पुन्हा एकदा मराठी विरुद्ध हिंदी हा वाद पाहायला मिळा आहे. मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानकात मराठी बोलवण्यावर रेल्वे कर्मचाऱ्याच्या उद्धटपणाचं दर्शन झां आहे. मराठी बोलण्यास पूर्णपणे नकार दिला असून त्याच्या अरेरावीचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.



■पुणे। प्रतिनिधी,

मुंबई सेंट्रलवर भाषेच्या मुद्यावरुन पुन्हा एकदा वाद झाल्याच पाहायला मिळत आहे. मुंबईतील 'मुंबई सेंट्रल' हे रेल्वे स्टेशन अत्यंत गजबजलेलं असतं. या रेल्वे स्थानकातील कर्मचाऱ्याने एका प्रवाशासोबत अरेरावी केली आहे. मराठी बोलण्यास त्याने स्पष्टपणे नकार दिला आहे.

या घटनेचा संतापजनक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. नागरिकांच्या संतप्त प्रतिक्रिया पाहायला मिळत आहे.

व्हिडिओमध्ये नेमकं काय घडलं?

सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या या व्हिडिओमध्ये मुंबई सेंट्रल स्थानकाच्या चौकशी खिडकीवर ड्युटीवर असणारा एक कर्मचारी दिसत आहे. एक स्थानिक प्रवासी त्याच्याकडे जाऊन काही माहिती विचारत असताना त्याला मराठीत संवाद साधण्याची विनंती करतो. मात्र, प्रवाशाशी अरेरावी करत तो कर्मचारी अत्यंत उद्धटपणे आणि वाढलेल्या आवाजात "नही बोलूंगा मराठी" असे वारंवार सुनावताना ऐकू येत आहे. केवळ नकार देऊन तो थांबला नाही, तर व्हिडिओ रेकॉर्ड करणाऱ्या प्रवाशाला हाताच्या इशाऱ्याने अत्यंत मग्रुरीने तिथून चालते होण्यासही तो सांगत असल्याचे या क्लिपमध्ये स्पष्टपणे कैद झाले आहे.

पुन्हा हिंदी मराठी वाद चर्चेत

ही घटना मुंबईतील सर्वात महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या रेल्वे स्थानकावर घडल्याने याचे पडसाद वेगाने उमटत आहेत. या एका ताज्या घटनेमुळे राज्यातील केंद्र सरकारी कार्यालये, रेल्वे, बँका आणि इतर सार्वजनिक आस्थापनांमध्ये स्थानिक भाषेचा वापर करण्यावरून जो जुना वाद आहे, तो पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. महाराष्ट्रात नोकरी करून आणि इथल्याच स्थानिक लोकांशी दैनंदिन संपर्क येत असताना, या कर्मचाऱ्यांकडून असा भाषिक दुजाभाव आणि अरेरावी का सहन करावी? असा संतप्त सवाल या निमित्ताने मराठी माणसांकडून विचारला जाऊ लागला आहे.

सोशल मीडियावर संतापाची तीव्र लाट

हा व्हिडिओ इंटरनेटवर पडताच नेटकऱ्यांनी रेल्वे कर्मचाऱ्याच्या या मुजोरपणाचा खरपूस समाचार घेण्यास सुरुवात केली आहे. एका संतापलेल्या युजरने प्रशासनाला खडेबोल सुनावताना म्हटले आहे की, "सरकारी कर्मचारी नेहमीच अशा गुंडगिरीच्या आणि अरेरावीच्या अविभार्वात प्रवाशांशी वागतात. जेव्हा तुम्ही महाराष्ट्रात काम करता आणि तुमच्याकडे येणारे बहुतांश प्रवासी हे स्थानिक मराठी भाषिक असतात, तेव्हा तुम्हाला मराठीतच संवाद साधता आला पाहिजे. तसेच महाराष्ट्राच्या हद्दीतील रेल्वे स्थानकांवरील सर्व घोषणाही प्रामुख्याने मराठीतच व्हायला हव्यात." अशा अनेक संतप्त प्रतिक्रियांच्या माध्यमातून नागरिकांनी आपला रोष व्यक्त केला आहे.

आधी लघवी पाजली मग विजेचे शॉक दिले

पुण्यात भोंदूबाबाकडून 26 वर्षीय तरुणीसोबत किळसवाणे कृत्य!

59 वर्षीय राधामोहन मिश्रा याने स्वतःला दैवी शक्ती लाभलेली व्यक्ती आणि ईश्वराचा अवतार म्हणून सादर केले.

■पुणे। प्रतिनिधी,

पुण्यात अंधश्रद्धा, मानसिक छळ आणि कथित लैंगिक शोषणाचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. स्वतःला "ईश्वराचा अवतार" असल्याचे सांगणाऱ्या एका भोंदूबाबाविरोधात गंभीर आरोप करण्यात आले आहेत. एका उच्चशिक्षित महिलेच्या तक्रारीनंतर पोलिसांनी मुख्य आरोपीसह आठ जणांना अटक केली असून या प्रकरणामुळे राज्यभरात खळबळ उडाली आहे. प्राथमिक तपासात पीडित महिलेवर तब्बल 26 वर्षे विविध प्रकारचे अत्याचार झाल्याचे आरोप समोर आले आहेत.

'मीच देवाचा अवतार' म्हणत कुटुंबाचा विश्वास जिंकला

59 वर्षीय राधामोहन मिश्रा याने स्वतःला दैवी शक्ती लाभलेली व्यक्ती आणि ईश्वराचा अवतार म्हणून सादर केले. पोलिसांनी यासंदर्भात माहिती दिली. पीडित महिलेच्या कुटुंबाचा त्याच्याशी परिचय एका तथाकथित धार्मिक व्यक्तीमार्फत झाला होता. कुटुंबाच्या श्रद्धेचा फायदा घेत त्याने हळूहळू सर्वांवर प्रभाव निर्माण केला आणि महिलेवर मानसिक नियंत्रण मिळवल्याचा आरोप आहे.

लघवी पाजणे, विजेचे शॉक देणे; अमानुष छळाचे आरोप

तक्रारीनुसार, उपचार आणि आध्यात्मिक शुद्धीकरणाच्या नावाखाली महिलेला स्वतःची लघवी पिण्यास भाग पाडण्यात आले. तसेच तिला विजेचे शॉक देण्यात आले, मारहाण करण्यात आली आणि दीर्घकाळ मानसिक तसेच शारीरिक छळ सहन करावा लागला. या कथित प्रकारांमुळे पीडितेवर गंभीर मानसिक परिणाम झाल्याचे सांगितले जात आहे.

पतीपासून विभक्त होण्यास भाग पाडल्याचा आरोप

आरोपीने महिलेच्या वैयक्तिक आयुष्यात हस्तक्षेप करून तिला पतीपासून दूर जाण्यास भाग पाडल्याचा आरोपही करण्यात आला आहे. एवढेच नव्हे तर तिची मालमत्ता आणि आर्थिक व्यवहारांवर नियंत्रण मिळवण्याचाही प्रयत्न केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. श्रद्धा आणि भीती यांचा वापर करून पीडितेला एकाकी करण्यात आल्याचा संशय तपास यंत्रणांना आहे.

आश्रमावर छापा; मोठा डिजिटल आणि संशयास्पद साठा जप्त

तक्रार दाखल झाल्यानंतर पोलिसांनी वाघोली परिसरातील आश्रमावर कारवाई केली. या छाप्यात लॅपटॉप, मोबाईल, हार्ड डिस्क, पेनड्राइव्ह, कॅसेट्स, जिवंत काडतुसे आणि मोठ्या प्रमाणात औषधांचा साठा जप्त करण्यात आला. जप्त साहित्याच्या आधारे आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता तपास यंत्रणांनी व्यक्त केली आहे.


आणखी पीडित समोर येण्याची शक्यता; तपास वेगात

या प्रकरणात दोन पुरुष आणि सहा महिलांना अटक करण्यात आली आहे. पोलिस सध्या आरोपींच्या नेटवर्कचा तपास करत असून आणखी महिलांनी पुढे येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अंधश्रद्धेच्या नावाखाली लोकांची फसवणूक करणाऱ्या टोळ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरत आहे.



वसईत रेशन धान्याच्या बेकायदा विक्रीचा पर्दाफाश

कार्ड धारकांनी विकलेले तब्बल १२० क्विंटल धान्य जप्त



■वसई। प्रतिनिधी,

वसईमध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील रेशन धान्याच्या काळाबाजाराविरोधात पुरवठा विभागाने मोठी कारवाई केली आहे. वसई पश्चिमेतील झेंडा बाजार परिसरातील एका रेशन दुकानातून लाभार्थ्यांना मिळणाऱ्या धान्याची बेकायदेशीर विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पुरवठा विभागाने छापा टाकत तब्बल १२० क्विंटलहून अधिक धान्यसाठा जप्त केला आहे. या प्रकरणी दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. शासनाकडून गरीब आणि गरजू नागरिकांसाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत धान्य पुरवले जाते. मात्र हेच धान्य काळाबाजारात विकले जात असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. अशाच एका तक्रारीची दखल घेत वसई तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागाने झेंडा बाजार परिसरात कारवाई केली. पुरवठा अधिकारी भागवत सोनार यांना मिळालेल्या माहितीच्या आधारे पथकाने संबंधित ठिकाणी छापा टाकला. या कारवाईत तब्बल १२० क्विंटलहून अधिक धान्यसाठा जप्त करण्यात आला. जप्त केलेल्या धान्यामध्ये शासनाच्या वितरणासाठी असलेले धान्य असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणी इम्तियाज असीम शेख आणि त्याच्या एका साथीदाराविरोधात पुरवठा विभागाच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लाभार्थ्यांसाठी असलेल्या धान्याचा गैरवापर करून त्याची बेकायदेशीर विक्री केल्याचा आरोप संबंधितांवर ठेवण्यात आला असून पोलिसांकडून आणि पुरवठा विभागाकडून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील धान्याचा गैरवापर होत असल्याचे आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा पुरवठा विभागाने दिला आहे. शासनाकडून मिळणारा शिधा बेकायदेशीररित्या विक्रीसाठी वापरला जात असल्याचे आढळल्यास संबंधित कार्डधारकांचे रेशन कार्डदेखील रद्द करण्यात येईल, असे पुरवठा अधिकारी भागवत सोनार यांनी स्पष्ट केले आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

युद्ध संपले; शांतता नांदेल?



अमेरिका आणि इराण यांनी युद्धसमाप्तीची घोषणा केली आहे. त्यातही अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डॉनल्ड ट्रम्प यांनी 'हॉर्मुझ सामुद्रधुनीच्या दोन्ही बाजूंनी तेल प्रवाहित होणार', असे म्हटले आहे. थोडक्यात या सामुद्रधुनीची कोंडी फुटली असून या जलमागार्तून तेल वाहून नेणाऱ्या नौका आता मुक्त विहार करू शकणार आहेत. या युद्धसमाप्तीमुळे अनेक प्रश्न मात्र अनुत्तरित आहेत. हे युद्ध नेमके कुणी जिंकले? या युद्धातून काय साध्य झाले? आणि युद्धसमाप्ती ही तात्कालिक आहे कि प्रदीर्घ? याची उत्तरे कुणाकडेही नाहीत. ट्रम्प यांच्या मनात आले आणि त्यांनी युद्ध चालू केले अन् आता युद्धाची खुमखुमी संपल्यावर त्यांनी युद्धसमाप्तीचे तुणतुणे वाजवायला चालू केले. 'आम्ही इराणचे अस्तित्व नष्ट करू, त्याच्या पायाभूत सुविधा नष्ट करू, त्याची कोंडी करून तेथे उपासमारी घडवून आणू', अशा भीमगर्जना ट्रम्प यांनी केल्या होत्या. त्याप्रमाणे युद्ध पुकारल्यावर पहिल्या काही दिवसांमध्ये इराणचे आघाडीचे आणि दुर्सऱ्या फळीतील नेते अन् सैन्याधिकारी यांना ठार मारल्यावर 'अमेरिका तिच्या ध्येयाकडे वाटचाल करत आहे', असे वाटू लागले होते; मात्र इराणने अनपेक्षितपणे चिवट प्रतिकार केला आणि अमेरिकेचे सर्वच आराखडे चुकले. 'युद्ध आठवड्याभरात संपवू', अशा फुशारक्या मारणारी अमेरिका ताळ्यावर आली. काही अमेरिकी नेते आणि सुरक्षा विश्लेषक यांच्या मते, या युद्धाचा दैनंदिन खर्च १ अब्ज डॉलर्स (अनुमाने ८ सहस्र ४०० कोटी रुपये) पेक्षा अधिक होता. युद्धाच्या आरंभीच्या काळात, म्हणजे केवळ पहिल्या ४८ घंट्यांतच अमेरिकेने शस्त्रास्त्रांवर ५१ सहस्र कोटी रुपयांहून अधिक खर्च केल्याचा अंदाज वर्तवण्यात आला होता. १०७ दिवसांच्या युद्धाचा विचार करता, हा आकडा इतका प्रचंड आहे की, त्याने जागतिक अर्थव्यवस्थेलाही हादरवून सोडले आहे. या प्रचंड आर्थिक हानीमुळे अमेरिकेला युद्ध थांबवण्याचे वेध लागले. त्यानंतर ट्रम्प यांनी युद्धाच्या संदर्भात जी वक्तव्ये केली, त्यामुळे लोकांचे निव्वळ मनोरंजन झाले. या पूर्ण कालावधीत इराणने 'संयम, धैर्य आणि कूटनीती यांचा योग्य मेळ असला, तर महासत्तेलाही झुकवू शकतो', हे जगाला दाखवून दिले. युद्धशास्त्रात एक नियम आहे, 'युद्ध जिंकायचे असेल, तर शत्रूला कधीही न्यून लेखू नका!' अमेरिका-इराण युद्धाने हे जगाला दाखवून दिले. या युद्धात अमेरिकेची पुरती नाचक्की झाली आणि त्याहून अधिक ट्रम्प यांनी जी बालिश बडबड केली, त्यामुळे त्यांनी विश्वासार्हता गमावली. त्याही पुढे जाऊन अमेरिकेने तिचे मित्रही गमावले. युद्धाचा कालावधी जसा वाढत गेला, तसे ट्रम्प अस्वस्थ झाले. इराण बधत नाही; म्हणून त्यांनी पाश्चात्त्य देशांना इराणच्या मागे लावण्याचा प्रयत्न केला; मात्र मित्रदेशांनी यास नकार दिल्यावर ट्रम्प यांनी थयथयाट केला आणि त्यांना मोठ्या प्रमाणात दरडावले. यामुळे बिथरलेल्या या मित्रदेशांनी भविष्यातही अमेरिकेपासून चार हात लांब रहाणे पसंत केल्यास आश्चर्य वाटणार नाही. तात्पर्य काय? या युद्धामुळे अमेरिका शक्तीशाली असल्याचा जो फुगा निर्माण झाला होता, तो आता फुटला आहे. युद्धाची हीच फलनिष्पत्ती आहे. इराणमधील हुकूमशाही मिटवायची, हा युद्धाचा प्राथमिक उद्देश होता; मात्र त्याहून अधिक इराणच्या अणूकार्यक्रमाला खीळ घालून त्याचे 'अण्वस्त्रधारी' होण्याचे स्वप्न धुळीला मिळवण्यासाठी अमेरिकेने कंबर कसली होती. आता युद्धसमाप्तीची घोषणा झाल्यानंतर या सूत्राविषयी इराण चिडीचूप आहे. दोन्ही देशांमध्ये झालेल्या शांतता करारामध्ये 'हॉर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा खुली करणे' आणि 'सैनिकी कारवाया तात्काळ थांबवणे' यांवर भर देण्यात आला आहे. इराणच्या अणूकार्यक्रमाचा विषय पुढील वाटाघाटींसाठी राखून ठेवण्यात आला आहे. इराणने अणूकार्यक्रम पूर्णपणे 'रहित' करण्याचे अधिकृतपणे घोषित केलेले नाही. इराणकडील अणूसाठ्यांचे किंवा समृद्ध युरेनियमचे काय करायचे? हे तांत्रिक आणि कूटनीतिक सूत्र अजूनही सुटलेले नाही. युद्धसमाप्तीच्या करारावर १९ जूनला स्वाक्षरी झाल्यानंतर पुढील ६० दिवसांत या तांत्रिक सूत्रावर चर्चा केली जाणार आहे. याचा अर्थ ६० दिवसांमध्ये काहीही होऊ शकते आणि समजा या कालावधीत इराण 'आम्ही आमचा अणूकार्यक्रम रहित करणार नाही' या सूत्रावर ठाम राहिला, तर अमेरिका पुढे काय करणार? पुन्हा युद्ध चालू करणार का? त्यामुळे हे युद्ध संपले असले, तरी अणू शस्त्रास्त्रांचा धोका किंवा तो प्रश्न पूर्णपणे मिटलेला नाही, हेच सध्याचे वास्तव आहे. 'युद्धसमाप्तीची घोषणा ही अमेरिका आणि इराण यांच्यात झाली आहे अन् इस्रायलचा या कराराशी काही संबंध नाही', असे इस्रायलने स्पष्ट केले आहे. या कराराची व्याप्ती पहाता 'लेबनॉनसह सर्व क्षेत्रांतील युद्ध आणि सैनिकी कारवाया कायमस्वरूपी थांबवण्यात येतील', असे सांगण्यात येत आहे. अमेरिकेने हेही स्पष्ट केले आहे की, जर लेबनॉनमधील हिजबुल्ला किंवा इराण यांनी पुन्हा क्षेपणास्त्रांनी आक्रमण केले, तर इस्रायल किंवा अमेरिका यांना स्वसंरक्षणाचा पूर्ण अधिकार आहे आणि ते प्रत्युत्तर देतील. दुसरीकडे इस्रायलने या कराराच्या कार्यवाहीविषयी स्वतःची वेगळी भूमिका मांडली आहे. इस्रायलचे संरक्षणमंत्री इस्रायल काट्झ यांनी स्पष्ट केले आहे की, लेबनॉन, सीरिया आणि गाझा येथे इस्रायलने जी भूमी कह्यात घेतली आहे, त्या ठिकाणांहून ते माघार घेणार नाहीत आणि तेथे त्यांचे सैन्य कायम ठेवतील. थोडक्यात कराराच्या प्रारूपात लेबनॉनचा उल्लेख करून तिथे युद्धबंदी घोषित करण्यात आली असली, तरी प्रत्यक्षात तिथल्या परिस्थितीवर इस्रायलच्या भूमिकेमुळे अजूनही अनिश्चितता कायम आहे. एकंदरीत युद्धसमाप्ती ही कागदोपत्री आहे. यामुळे आखाती देश आणि तेथील परिसरात भविष्यात शांतता नांदेल, असे सध्या तरी चित्र दिसून येत नाही. या युद्धामुळे 'बळी तो कान पिळी' हे पुन्हा एका सिद्ध झाले. महासत्ता असणाऱ्या देशांच्या मनात आले, तर ते हवे ते, हवे तेव्हा आणि हवे तिकडे काहीही करू शकतात. जगात 'शांतीदूत' म्हणून मिरवणाऱ्या अनेक मानवतावादी संघटना आहेत, तसेच 'संयुक्त राष्ट्र'सारख्या संघटना आहेत; मात्र ते युद्ध थांबवू शकले का? जेव्हा महासत्ता असणारे देश अशा प्रकारे जगाला वेठीस धरतात, त्या वेळी या जागतिक संघटना शेपूट घालण्यापलीकडे काहीही करू शकत नाहीत. हे लक्षात घेता अन्य कुणी डोळे वर करून भारताकडे पहाण्याचे धारिष्ट्य करणार नाही, अशी पत भारताने जगात निर्माण करणे आवश्यक! हे युद्ध काही शेवटचे नव्हते, तर भविष्यातील याहून मोठ्या युद्धाची ही नांदी आहे. जगात अनेक देशांमध्ये अस्वस्थता आहे. त्याचा भडका कधीही उडू शकतो. तो उडाल्यास त्याला सामोरे जाण्यासाठी भारतीय जनतेनेही सिद्ध रहाणे आवश्यक!

जल खोल चालले...

अनेक शहरांमध्ये रस्ते, पूल अशा जागा मिळेल, त्या ठिकाणी काँक्रीट ओतून ठेवण्यातच यंत्रणांना रस असल्याने पाणी जमिनीत मुरण्यास जागा शिल्लक नाही; दुसरीकडे भूजलाचा अनिर्बंध उपसाही सुरूच आहे.



जून महिना निम्मा सरला, तरी वरुणराजाचे आगमन न झाल्यामुळे चिंताक्रांत झालेल्या अवघ्या महाराष्ट्राने देव पाण्यात घातले आहेत. मान्सून कोकणातून पुढे सरकत नसल्यामुळे पेरण्यांचा विषय अजून दूरच; आता राज्यापुढे पिण्याच्या पाण्याचीही चिंता निर्माण झाली आहे. राज्यातील प्रमुख धरणांमधील पाण्याचे साठे दिवसेंदिवस घटत असल्याने पाणी जपून वापरण्याचे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना करण्याची वेळ आली आहे. याआधी १५ जूननंतर पावसाची आशा होती; आता २२ ते २५ जूननंतरच मान्सूनसाठी अनुकूल स्थिती निर्माण होण्याचा सुधारित अंदाज आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करण्यावाचून गत्यंतर नाही. मात्र, या काळात नागरिकांच्या हिताचे निर्णय घ्यावेत, त्यांच्या अंमलबजावणीसाठी प्रशासनावर दबावा आणावा, याऐवजी नेते मंडळी निरनिराळ्या राजकीय 'ऑपरेशन'मध्ये किंवा आपापले मतदारसंघ सोडून दिल्ली-मुंबईच्या वाऱ्या करण्यातच मश्गुल आहेत, हे आपले दुर्दैव.

नैर्ऋत्य मान्सूनचा प्रवास अद्यापही कोकणातच रखडला असून, वायव्येकडून येणारे उष्ण वारे त्याच्या मार्गात अवरोध करीत आहेत. त्यामुळे जूनच्या सरासरीमध्ये तीस टक्के घट आली आहे. आता महिनाअखेरीस पावसाला सुरुवात होईल, अशी आशा असली, तरी 'एल निनो' घटक सक्रिय झाल्याने महाराष्ट्रासह देशातील १२ राज्यांमध्ये मान्सून सरासरीपेक्षा कमी होण्याचा अंदाज आहे. अशा अनिश्चित काळात राज्यातील धरणांमध्ये २५ टक्के इतकाच उपयुक्त साठा आहे. गेल्या वर्षी राज्यात सरासरीच्या १०९ टक्के पाऊस झाला होता; त्यातही उत्तरार्धात अतिवृष्टी होऊन बंधारे फुटेस्तोवर पाऊस झाला. गेल्या वर्षी जूनमध्ये धरणांमध्ये ३१ टक्के साठा होता; त्यानंतर प्रचंड पाऊस होऊनही यंदा केवळ २५ टक्केच साठा कसा शिल्लक राहिला, याची झाडाझडती सरकार घेणार की नाही? निवडणुकांच्या काळात आणि राजकीय पद्धतीने मागणी येईल, तसे पाणी सोडण्यामुळे आज धरणे तळाला गेली आणि हा पेचप्रसंग उभा राहिल्याच्या आरोपांचे नेमके उत्तर जलसंपदा खात्याने दिले पाहिजे. आता हे पाणी येत्या ३१ ऑगस्टपर्यंत पुरवून वापरण्याच्या सूचना सरकारने केल्या आहेत. परंतु, यंदाचा अनुभव लक्षात घेता तेवढ्यावर थांबून चालणार नाही.

पाऊस खरेच कमी झाला, तर पुढच्या उन्हाळ्यात पाणीपुरवठ्याचे मोठे संकट येऊ शकते, हे लक्षात घेऊन काटेकोर नियोजन केले पाहिजे आणि काटकसरीचे योग्य व न्याय्य उपाय योजले पाहिजेत. धरणे रिकामी आणि विहिरी कोरड्या पडल्यामुळे मराठवाडा आणि विदर्भासह राज्याच्या विविध भागांत टँकरने पाणी पुरवण्याची वेळ आली आहे. 'टँकरमुक्त महाराष्ट्र' अशा घोषणा नागरिक अनेक दशके ऐकत आहेत. त्यासाठी काही उपाययोजना झाल्या. सिंचन महामंडळे आली, जलजीवन मिशनसारख्या योजनांद्वारे पाणीपुरवठ्याच्या सोयी झाल्या; मात्र लोकसंख्येचा रेटा आणि पाण्याची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी अशा उपायांना गती देण्याची गरज आहे. त्या पार्श्वभूमीवर मंत्रिमंडळाच्या बैठकीत 'महाराष्ट्र ग्रामीण पेयजल धोरणा' ला दिलेली मान्यता महत्त्वाची आहे. यानुसार जलजीवन मिशन २.० मधील योजनांच्या दुरुस्तीला आणि पाण्याच्या पुनर्वापराला गती देण्यासारखे काही उपाय होतील. मात्र, या धोरणानुसार जलजीवन मिशन योजनेअंतर्गत पाणी मिळणाऱ्या वापरकर्त्यांना दीडशे ते चारशे रुपयांची पाणीपट्टी भरावी लागणार आहे.

यापुढील काळात किमान क्रयशक्ती असलेल्या वर्गाने तरी मोफत पाण्याची अपेक्षा धरणे योग्य होणार नाही आणि पाण्याच्या उधळपट्टीलाही चाप लावावा लागेल. घरगुती वापरापासून ते शेतीमध्ये पाण्याचा मोजूनच वापर करण्यासाठी राजकीय इच्छाशक्तीची मोठी गरज आहे. सांडपाण्याच्या पुनर्वापराला गती देण्याची गरज मंत्रिमंडळानेच मान्य केली, हे बरे झाले; कारण राज्यात हे पुनर्वापराचे प्रमाण केवळ पाच टक्के आहे. ह्यापाण्याचा एकही थेंब वाया जाऊ देणार नाही,ह्ण हे वाक्य केवळ घोषणांमध्ये राहिल्याचे दिसते.

राज्यात विविध भागांत जलसंधारण योजना अपूर्ण असून अनेकांमध्ये पाणी साठत नाही; तसेच अनेक ठिकाणी वितरण व्यवस्था नाही, असे महालेखापालांच्या अहवालात आढळून आले आहे. अशा आव्हानाच्या काळात सरकारने कंबर कसणे आणि जनतेनेही पाण्याच्या योग्य वापरावर भर देण्याची गरज आहे.



नियोजनाची घागर उताणी

राज्यातील बहुतेक भागांमध्ये धरणांतील जलसाठ्यांनी तळ गाठले आहेत. मुंबईला पाणी पुरवणाऱ्या धरणांमध्ये पंधरा ते वीस टक्के, तर पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांमध्ये दहा टक्के साठा शिल्लक आहे.

जूनच्या मध्यापर्यंत मान्सूनची चाहूल न लागल्याने आणि आणखी काही दिवस तरी पावसाची शक्यता नसल्यामुळे राज्यापुढे दुष्काळी स्थितीचे आव्हान उभे आहे. गेल्या वर्षी अतिवृष्टीमुळे धरणे काठोकाठ भरल्यानंतर सहा-सात महिन्यांतच ही वेळ का यावी, हा प्रश्न पडणे साहजिकच. जलसाठ्यांच्या व्यवस्थापनातील अपयश, हे त्याचे सरळसरळ उत्तर. पुणे, मराठवाडा, विदर्भ आणि नाशिक या विभागांतील धरणे जवळजवळ रिकामी झाली आहेत. त्यामुळे नव्या युगातील या 'मंदिरां'च्या पोटातील प्राचीन मंदिरे आणि गावांचे अवशेष पृष्ठभागावर येत आहेत. बहुधा कोरड्या न पडणाऱ्या कोयना धरणातही केवळ नऊ अब्ज घनफूट (टीएमसी) इतकाच साठा शिल्लक आहे. त्यामुळे वीजनिर्मिती जवळपास थंडावली असून, दमदार पाऊस झाला नाही, तर सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांच्या अनेक भागांमध्ये पिण्याच्या पाण्याच्या टंचाईची भीती आहे. या परिस्थितीला तोंड देण्यासाठी सरकारी उपाययोजना सुरू होतीलच; पण त्यापूर्वी गेल्या वर्षभरात धरणांमधील पाण्याचा विनियोग कसा केला, आणि आताच ही वेळ का आली, याची झाडाझडती घेऊन जनतेसमोर सत्य मांडणे आवश्यक आहे. नागपूर, छत्रपती संभाजीनगर, जालना-परभणी आणि खानदेशातील अनेक शहरांमध्ये आठवड्यातून एक-दोनदाच पाणी येते. खरे तर १५ जुलैपर्यंत पिण्यासाठी पुरेल, एवढा जलसाठा राखून ठेवण्याचे नियोजन जलसंपदा विभाग आजवर करत आला आहे. मग, दीड महिना आधीच ही परिस्थिती उद्भवली; म्हणजेच उपलब्ध पाण्याचे नियोजन आणि वितरणात काही तरी चुकते आहे, हे नक्की. मुख्य अडचण जलसाठे राखणारा जलसंपदा विभाग आणि शहरात पाणीवितरण करणारी महापालिका यांच्यातील समन्वयाच्या अभावात आहे. पुण्याच्या पाण्यात ४० टक्के गळती असल्याची कबुली पूर्वी महापालिका आयुक्तांनी दिली होती; ती दूर करण्यासाठी काय पावले उचलली, याचे उत्तर मिळालेले नाही. पूर्वी कालव्यातून पाणीपुरवठा करताना पाण्याची गळती-वाफ होते, असे सांगितले जाई. आता महापालिका शंभर टक्के पाणी जलवाहिनीतून घेते, त्यामुळे तोही प्रश्न राहिला नाही. अशा वेळी 'ग्रामीण विरुद्ध शहरी' असा वाद जाणीवपूर्वक पेटवून दिला जातो. खरे तर पाऊस कमी होणार, याचे अंदाज दोन महिन्यांपूर्वीच आले असतानाही उन्हाळ्यात कालव्यातून पाणी का सोडले गेले आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या आचारसंहिता काळात कोणाच्या सूचनांवरून पाणी सोडले, अशा प्रश्नांची उत्तरे नागरिक मागत आहेत. पुण्यात दोन-चार टीएमसी पाण्यावरून वाद आहेत; उजनीची कथा वेगळीच आहे. राज्यातील सर्वांत मोठे, शंभर टीएमसी क्षमतेचे हे धरण पूर्ण भरते आणि वर्षात ते रिकामेही केले जाते; त्याची कुठेही हाक ना बोंब! त्याच धरणावर अवलंबून असलेल्या सोलापुरात मात्र अजूनही चार-पाच दिवसांनीच पाणी मिळते. दररोज पाणीपुरवठ्याच्या आश्वासनांना भुलून नागरिकांनी सत्तांतरही केले; पण दोन निवडणुकांनंतरही पाण्याच्या स्थितीत थेंबभराचाही फरक नाही. जून महिन्याच्या सुरुवातीलाच अनेक गावे-शहरांमध्ये टँकरने पाणीपुरवठा सुरू झाल्याने टँकर माफियांचेही फावले आहे. टँकरमुक्त महाराष्ट्राच्या घोषणा गेली तीन दशके ऐकू येत आहेत; पण पाऊस कमी होवो की अधिक, अद्याप तरी त्यातून महाराष्ट्राची सुटका झालेली नाही. बेसॉल्ट खडकांनी बनलेल्या महाराष्ट्राच्या बहुसंख्य भागांत पाणी साठवणे आणि सिंचनावर मर्यादा आहेत. अशा स्थितीत उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन हाच मार्ग उरतो. 'जलयुक्त शिवार' सारख्या योजना पूरक म्हणून महत्त्वाच्या आहेत, मात्र दुष्काळ मुक्तीचा तो मुख्य उपाय नव्हे. पर्जन्य जलसंचय करून भूजलाच्या साठ्यात भर घालणे किंवा शहरांतील वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करण्यासाठी कायदे-नियम सारे तयार आहेत. मात्र, त्याच्या अंमलबजावणीचाही भीषण दुष्काळ आहे. पाण्याच्या पुनर्वापराचे प्रमाण दहा टक्केही नाही. शहरांतील वाहिन्यांची दुरुस्ती, धरणांतील गाळ काढणे, गळती-पाणीचोरी रोखणे अशा अनेक उपाययोजना कागदावरच आहेत. योजनांचा अवाढव्य खर्च, तंत्रज्ञान अशा अनेक अडचणी त्यामागे आहेत; मात्र मुख्य अडसर आहे राजकीय इच्छाशक्तीचा. तो दूर होईल तो सुदिन!

मन उधाण वाऱ्याचे



वेड्या मना गुंतताना कर विचार एकदा
जागेपणी स्वप्न वेडी पडतील अनेकदा।
वेदना कोवळी आली अलगद ओठावरी
तू न जाणे की न जाणे मन उधाण
वाऱ्यावरी श्वास घे रे ध्यास दे रे जगणे
दे माझे मला हात हातात घेऊन घालते
शपथ तुला । सजले धजले मन अंगीया
आले उधाण हळुवार या वाऱ्याचे पायी
बांधू रूणझुण । कोणीचं नाही कोणाचे
तू तिथे अन् मी इथे आतुरलेल्या क्षणांना
करून जाशी पालथे।

माज्याचं कवितेच्या या ओळी वारंवार तरंग निर्माण करतात. अथांगच्या लाटेत मी पणा विरून जावा. सागराला साक्ष ठेवत बांधलेली नाती, स्वप्नांचे मनोरे, तुज्यासोबतच्या आठवणीं सोनेरी वाळूत रित्या कराव्यात. शब्दांना मुक्त करून हृदयातली खळखळ ओरडून सांगावी. मनात जपलेली रूजुता दोघांच्या मनोभूमिकेला जोडणारं सुदृढ नातं वाऱ्याशी जोडून घ्यावं, त्याला आपलसं करत हितगुज करावं. प्रेमाचा सांगावा धाडावा आपल्या प्रिय व्यक्तीला. थोडं रूसून थोडं हसून वाद घालावे जन्मभराचे. मन उधाण वाऱ्याचे, गुज पावसाचे का होते बेभान कसे गहिवरते... मनाचा पहिला आणि शेवटचा पैलू म्हणजे गहिवरणं होय. खूप बोलायचं असून देखील बोलता येत नाही तेव्हा प्रकर्षाने जाणवणारा भाव म्हणजे गहिवरून येणं. पावसाची संततधार, खट्याळ वऱ्यासह गहिवरलेल्या मनाची पाती निसर्गासंगे बोलू लागतात. चमत्कार अवनीचा पाहण्यास । मी जाय धरणी माझी माय।। ह्या हिरव्या पांदण वाटा। कसे ओढती माझे पाय।। बेधुंद वाहतो वारा। तनमन पुलकित सारे।। वसुंधरेला खुणावती ही सताड उघडी दारे। समिंदराला उधाण येता हवे आणखी काय?।। ह्या हिरव्या पांदण वाटा ओढती माझे पाय। वाऱ्याच्या संगतीने डुलते ।। हिरवे हिरवे रान,। किलबिलणारी पाखरे बसली।। फांदीवरती छान। दूरस्थ कोकिळ पानाआडून लयीत गाते माय।। ह्या हिरव्या पांदण वाटा। ओढती माझे पाय।। सुंदर नयनरम्य निसर्गाच्या झुल्यावर हेलकावे खाऊ लागलेलं मन शरीरात नक्की कुठे असतं? आशिकीमुळे दिल की धडकन वाढते आणि रोमांचित तनू अवस्था होते. प्रेमात पडलेला प्रत्येकजण जेव्हा परस्पर आकर्षित होतो तेव्हा उधाणलेल्या बेधुंद वाऱ्यासारखी अवस्था होते.

दक्षिण महाराष्ट्रासाठी धोक्याची घंटा

सांगली जिल्हा, जो सहकार चळवळ आणि कृषी समृद्धीसाठी ओळखला जात होता, तो सध्या वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे चर्चेत आहे. खून, टोळी संघर्ष आणि संघटित गुन्हेगारीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून, कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

एकेकाळी साखर कारखाने, सहकार चळवळ, कृषी समृद्धी आणि शांत सामाजिक वातावरणासाठी ओळखला जाणारा सांगली जिल्हा सध्या वाढत्या गुन्हेगारीमुळे चर्चेत आला आहे. गेल्या काही महिन्यांत घडलेल्या खून, टोळी संघर्ष, घरफोड्या, अवैध व्यवसाय आणि संघटित गुन्हेगारीच्या घटनांमुळे केवळ सांगलीकरच नव्हे, तर संपूर्ण दक्षिण महाराष्ट्रातील नागरिकांमध्येही चिंता वाढली आहे. अलीकडेच अभयनगर परिसरात घडलेल्या वेदांत बंडगर हत्याकांडाने राज्यभरात खळबळ उडाली. पाच जणांच्या टोळीने घरात घुसून अवघ्या १४ वर्षीय मुलाची गोळ्या झाडून हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. प्राथमिक तपासात हल्लेखोरांचे लक्ष्य कुटुंबातील अन्य व्यक्ती असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या घटनेमुळे गुन्हेगारांचे वाढते धाडस आणि कायद्याच्या भीतीत झालेली घट यावर पुन्हा एकदा गंभीर चर्चा सुरू झाली आहे. याआधीही सांगली शहर आणि परिसरात खून, टोळी संघर्ष आणि वर्चस्वासाठी होणाऱ्या लढाया सातत्याने समोर येत आहेत. काही महिन्यांपूर्वी विश्रामबाग परिसरात एका युवकाचा खून करून त्याचा मृतदेह विहिरीत टाकल्याची घटना उघडकीस आली होती. या प्रकरणात अल्पवयीन मुलांचा सहभाग असल्याचे तपासात समोर आले, ज्यामुळे युवकांमधील वाढती गुन्हेगारी प्रवृत्ती आणि सामाजिक चिंतेत भर पडल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे गुन्हेगारी आता केवळ रस्त्यांपुरती मर्यादित राहिलेली नाही. जिल्हा कारागृहात दोन टोळ्यांमध्ये झालेल्या हिंसक संघर्षामुळे कारागृह व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तुरुंगात १६ गुन्हेगारांनी दोन सराईत आरोपींवर विटांनी हल्ला केल्याची घटना संघटित गुन्हेगारीच्या वाढत्या प्रभावाचे संकेत देते. सांगलीतील वाढत्या गुन्हेगारीमागे अनेक सामाजिक, आर्थिक आणि भौगोलिक घटक कारणीभूत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. पश्चिम महाराष्ट्रातील प्रमुख व्यापारी व औद्योगिक केंद्रांशी असलेली सांगलीची जवळीक, सीमावर्ती भागातील वाहतूक मार्ग, वाढते शहरीकरण आणि बेरोजगारी यामुळे गुन्हेगारीस पोषक वातावरण निर्माण होत आहे. काही भागांमध्ये टोळीसंस्कृती, राजकीय आश्रय आणि स्थानिक वर्चस्वाच्या स्पर्धेमुळे गुन्हेगारीचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते. संजयनगर, कुपवाड, अभयनगर आणि काही उपनगरांमध्ये किरकोळ वादातून गंभीर गुन्हे घडण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. सोशल मीडियावर वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नातून तरुणांमध्ये निर्माण होणारी स्पर्धा, शस्त्रांचे प्रदर्शन आणि टोळीबाजीमुळे परिस्थिती अधिक गुंतागुंतीची बनत आहे. यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढत असून ही चिंतेची बाब ठरत आहे. सोशल मीडिया आणि स्थानिक ऑनलाइन चर्चांमध्येही सांगलीतील वाढत्या खून व हिंसक घटनांबाबत सातत्याने चिंता व्यक्त केली जात आहे. दक्षिण महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत सांगलीचे भौगोलिक स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. कोल्हापूर, सातारा, सोलापूर तसेच कर्नाटक राज्याच्या सीमेजवळ असल्यामुळे गुन्हेगारांच्या हालचाली तुलनेने सुलभ होतात. त्यामुळे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी विविध जिल्ह्यांतील पोलीस यंत्रणांमध्ये अधिक प्रभावी समन्वयाची गरज निर्माण झाली आहे. गुन्हेगारी रोखण्यासाठी केवळ पोलीस कारवाई पुरेशी ठरणार नाही. संघटित गुन्हेगारीविरोधात विशेष मोहिमा, तंत्रज्ञानाधारित तपास यंत्रणा, सीसीटीव्ही नेटवर्कचा विस्तार, टोळ्यांच्या आर्थिक स्रोतांवर कठोर कारवाई तसेच जलद न्यायप्रक्रिया यांची आवश्यकता आहे. देशातील इतर राज्यांमध्ये संघटित गुन्हेगारीविरोधात समन्वित आणि व्यापक कारवाया केल्यामुळे सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत. यासोबत युवकांसाठी रोजगाराच्या संधी वाढवणे, व्यसनमुक्ती मोहिमा राबवणे, शाळा-महाविद्यालयांत जनजागृती करणे आणि नागरिकझ्पोलीस संवाद मजबूत करणे आवश्यक आहे. सांगलीतील वाढती गुन्हेगारी ही केवळ जिल्ह्यापुरती मर्यादित नसून दक्षिण महाराष्ट्राच्या सामाजिक सुरक्षिततेचा गंभीर मुद्दा आहे. वेळेत कठोर व समन्वित उपाय न केल्यास या प्रदेशाच्या शांत व सांस्कृतिक ओळखीवर गुन्हेगारीचे सावट अधिक गडद होण्याची भीती आहे.



'खेला होबे' कोणाचा? लोकशाहीचा?



'खेला होबे' हा घोष एकेकाळी बंगालच्या राजकारणातील संघर्षाचे प्रतीक होता. आज तोच घोष वेगळ्या अर्थाने ऐकू येत आहे. बंगालमधील सध्याचा संघर्ष केवळ तृणमूल आणि भाजप यांच्यातील नाही. ती भारतीय लोकशाहीच्या मूल्याचीही परीक्षा आहे.

भारतीय राजकारणात सत्तांतर, पक्षांतर आणि राजकीय बंडखोरी या गोष्टी काही नवीन नाहीत. परंतु गेल्या काही वर्षांत या घटनांचा वेग, स्वरूप आणि परिणाम पाहता एक गंभीर प्रश्न उपस्थित होतो, लोकशाहीतील राजकीय स्पर्धा आता केवळ निवडणुकांपुरती मर्यादित न राहता संस्थांच्या नियंत्रणापर्यंत पोहोचलीय का? महाराष्ट्रात २०२२ मध्ये घडलेल्या शिवसेना फुटीपासून सुरू झालेला घटनाक्रम आता देशातील इतर राज्यांतही दिसू लागला आहे. बंगालमधील अलीकडच्या राजकीय घडामोडींनंतर हा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. पात्रे बदलली, राज्य बदलले, भाषा बदलली, परंतु राजकीय पटकथा मात्र तीच आहे. ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसमध्ये निर्माण झालेल्या अंतर्गत संघर्षाने बंगालच्या राजकारणाला मोठे वळण दिले आहे. या घडामोडी केवळ एका पक्षापुरत्या मर्यादित नाहीत, त्या भारतीय लोकशाहीच्या आरोग्याबाबतही अनेक प्रश्न निर्माण करतात.

महाराष्ट्र राजकीय मॉडेलची सुरुवात?

जून २०२२ मध्ये महाराष्ट्रात एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत मोठी फूट पडली. त्यानंतर पक्षाचे नाव, निवडणूक चिन्ह आणि संघटनात्मक वैधता यांबाबतचा संघर्ष देशभर चर्चेचा विषय ठरला. उद्धव ठाकरे यांची मूळ शिवसेना आणि शिंदे गट यांच्यातील लढाई न्यायालय निवडणूक आयोग आणि जनतेसमोर अनेक महिने सुरू राहिली. यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही अशीच फूट पडली. अजित पवार यांनी स्वतंत्र गट स्थापन करत सत्तेत सहभाग घेतला. परिणामी महाराष्ट्रातील दोन मोठे प्रादेशिक पक्ष विभाजित झाले. परंतु महाराष्ट्रातील घटनांनी एक गोष्ट स्पष्ट केली, एकदा मोठ्या प्रमाणावर आमदार किंवा खासदार पक्षाविरोधात उभे राहिले की, मूळ पक्षाचे अस्तित्वच धोक्यात येऊ शकते.

बंगालमध्ये काय घडले?

बंगालमध्ये तृणमूल काँग्रेस अनेक वर्षे सत्तेवर राहिल्यानंतर प्रथमच गंभीर राजकीय संकटात सापडल्याचे चित्र निर्माण झाले. पक्षातील असंतोष उघडपणे समोर येऊ लागला. काही नेत्यांनी स्वतंत्र भूमिका घेतली, तर काहींनी नेतृत्वावर प्रश्न उपस्थित केले. या घडामोडींमुळे एक मोठा प्रश्न निर्माण झाला, हा पक्षातील नैसर्गिक असंतोष आहे की बाह्य राजकीय दबावाचा परिणाम? महाराष्ट्रात जसे घडले तसेच बंगालमध्येही घडवून आणण्याचा प्रयत्न होत आहे.

केंद्रीय तपास यंत्रणा आणि राजकीय वाद

भारतीय राजकारणात ईडी, सीबीआय आणि आयकर विभाग यांच्या कारवायांवरून वाद नवीन नाहीत. केंद्रीय तपास यंत्रणांच्या वापरानेच भाजपा विरोधकांचे पक्ष फोडत आहे. तपास यंत्रणांचा वापर निवडक राजकीय नेत्यांवर दबाव निर्माण करण्यासाठी केला जातो आणि तो आरोपी असणारा नेता सत्ताधारी पक्षात दाखल झाल्यानंतर त्याच्यावरील कारवायांचा वेग कमी होतो हे अनेक उदाहरणांतून पाहायला मिळाले आहे. मात्र याबाबत केंद्र सरकार आणि भाजप यांचे म्हणणे आहे की भ्रष्टाचाराविरुद्ध कारवाई करणे ही यंत्रणांची घटनात्



नख वाढवणं आरोग्यासाठी त्रासदायक होऊ शकतं.....

बऱ्याच मुली आपली नखे वाढवतात आणि त्यांना तसं आवडत पण. जर आपण देखील नखं वाढविण्याची आवड ठेवत असाल, तर आपणास हे ठाऊक नसेल की असं करणं आरोग्यास जोखीम घेणं असू शकत, जाणून घेऊ या की नखं वाढवणं आपल्या आरोग्यास हानीप्रद कसं होऊ शकतं.

१. लांब नखं जास्त घाणेरडी असतात आणि त्याम ध्ये जंत होऊ शकतात, जेणे करून आपणास गंभीर संसर्ग होऊ शकतं. हे शक्य आहे की नेलपेंटच्या मागे त्याचा मधील साचलेली घाण दिसेनासी होते.

२. लांब नखे संभाव्यतः पिनव्हर्मस सारखे संसर्ग देऊ शकतात.

३. बऱ्याच अभ्यासातून सिद्ध झाले आहे नखांमध्ये आढळणारे जंत, मुलांमध्ये अतिसार आणि उलट्यांचा त्रासासाठी कारणीभूत ठरतात.

४. मुलांची नखे वाढलेली असल्यास, त्यांना स्वतः ला खाजविण्याच्या प्रयत्नात दुखापत होऊ शकते.

५. लहान बाळ असणाऱ्यांच्या आईला देखील स्वतःच्या नखांवर विशेष लक्ष दिले पाहिजे, लांब नखं त्यांचा स्वतःचा आरोग्यास तर खराब असतंच, त्याच बरोबर लहान बाळांना त्याच सांभाळतात, त्यामुळे आईचे लांब नखं असल्यामुळे बाळाला दुखापत होऊ शकते.

६. नखे स्वच्छ ठेवण्यासाठी हातांना धुताना नखे देखील व्यवस्थितरीत्या धुवावे.

शरीराची रोगप्रतिकार शक्ती वाढवण्यासाठी काढा फायदेशीर



शरीराची रोगप्रतिकार शक्ती वाढवण्यासाठी उपयुक्त ठरतो काढा : प्रसिद्ध शेफ अनहिता ढोंडी यांनी आपल्या इन्स्टाग्राम अकाउंटवर फायदे शीर काढा तयार जात काढ्याची रेसिपी शेअर केली आहे. हा काढा शरीराची रोगप्रतिकार शक्ती वाढवण्यासाठी ठरतो. ही रेसिपी एका आयुर्वेदीक काढ्याची आहे. घरातच सहज उपलब्ध होणाऱ्या पदार्थापासून करता येणार आहे. आपल्या घरातील वडिलधारी माणसंही अनेकदा वेगवेगळ्या काढ्यांचे फायदे आपल्याला सांगतात. अनेकदा काढ्याचा वापर अनेक आजारांवरील घरगुती औषध म्हणूनही केला असे. कोरोना काळातही आरोग्य उत्तम राहावं यासाठी अनेकजण घरगुती उपायांना प्राधान्य देत आहेत. काढ्यामध्ये हळद, तुळशीची पानं, वेलची, लवंग यांसारख्या घरगुती पदार्थीपासून काढा तयार केला जातो. आयुर्वेदातही या पदार्थांचं महत्त्व सांगण्यात आलं आहे. हे पदार्थ शरीराची रोगप्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी मदत करतात.

असा तयार करा आरोग्यासाठी गुणकारी ठरणारा काढा : यासाठी हळद, तुळशीची पानं, लवंग, वेलची, काळी मिरी आणि आलं यांसारख्या पदार्थांचा वापर केला आहे. काढा तयार करण्यासाठी एका भांड्यामध्ये पाणी गरम करा. त्यानंतर त्यामध्ये हळद आणि आल्याची मिक्सरमध्ये एकत्र करून पेस्ट तयार करून घ्या. पाणी गरम झाल्यावर ही पेस्ट पाण्यात घाला. पाण्याला उकळी आल्यानंतर त्यामध्ये इतर गोष्टी एकत्र करून १५ ते २० मिनिटांपर्यत उकळून घ्या. काढा तयार आहे. काढा गरम गरम प्या.

व्हिटॅमिन सी शरीरासाठी अत्यंत आवश्यक

शरीराची रोगप्रतिकार शक्ती वाढवण्याचा सल्ला वारंवार जागतिक आरोग्य संघटना आणि डॉक्टरांच्या वतीने केला जात आहे. त्यासाठी आहारात व्हिटॅमिन्स, मिनरल्स यांसारख्या अनेक घटकांचा समावेश करण्यास डॉक्टरांच्या वतीने सांगितलं जात आहे. अशातच अनेकदा डॉक्टर्स आणि आहारतज्ज्ञांकडून 'व्हिटॅमिन सी'चा उल्लेख सतत केला जात आहे. पण तुम्ही विचार केला आहे का? आपल्या शरीराला व्हिटॅमिन सीची गरज का असते आणि व्हिटॅमिन सी मिळवण्यासाठी कोणते मुख्य स्त्रोत कोणते? तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, व्हिटॅमिन सीला एस्कॉर्बिक ॲसिड असं म्हटलं जातं. शरीरात व्हिटॅमिन सीची कमतरता असल्यास शरीराला अनेक आजारांचा आणि समस्यांचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे व्हिटॅमिन सीचा आहारात समावेश करून शरीराच्या समस्या दूर करणं शक्य होतं.

व्हिटॅमिन सी शरीरासाठी का गरजेचं?

व्हिटॅमिन सी शरीरासाठी अत्यंत आवश्यक असतं. हे हाडं, त्वचा आणि रक्त वाहिन्यांचं आरोग्य उत्तम राखण्यासाठी मदत करतात. याचं प्रमाण कमी झाल्यामुळे रक्ताची कमतरता, हाडांच्या समस्यांचा सामना करावा लागतो. व्हिटॅमिन सी शरीराची रोगप्रतिकार शक्ती वाढवण्यासाठी मदत करतं. अनेक संशोधनांमधून समोर आलेल्या निष्कर्षांनुसार, व्हिटॅमिन सी सूर्याच्या प्रखर किरणांमुळे त्वचेला होणाऱ्या नुकसानापासून बचाव करतं. त्वचेचा कोरडेपणा कमी करतं. तसेच त्वचा तजेलदार करण्यासाठीही मदत करतं. डोळ्यांचं आरोग्य राखण्यासाठीही व्हिटॅमिन सीचं सेवन करणं फायदेशीर ठरतं.

व्हिटॅमिन सी पुरवण्यासाठी काय कराल?

फळं आणि भाज्या व्हिटॅमिन सीचा मुख्य स्त्रोत आहे. संत्री, लिंबू, ब्रॉकली, स्ट्रोबेरी, आवळा, पेरू किवी यांमध्ये मुबलक प्रमाणात व्हिटॅमिन सी असतं. दररोज कमीत कमी मिलीग्राम व्हिटॅमिन सीचं सेवन करणं गरजेचं आहे. दरम्यान, वेगवेगळ्या परिस्थितीत, वेगवेगळ्या लोकांसाठी हे प्रमाण बदलू शकतं. मानवी शरीरात व्हिटॅमिन सी तयार होत नाही, तसेच साठवूनही ठेवता येत नाही. त्यामुळे निरोगी राहण्यासाठी व्हिटॅमिन सी युक्त पदार्थांचा आहारात समावेश करणं अत्यंत फायदेशीर ठरंत.



'व्हिटॅमिन सी'ची कमतरता असल्यास शरीरात होतात हे गंभीर बदल

रोगप्रतिकार शक्ती उत्तम असली तर कोणतेच विषाणूजन्य आजार होऊ शकत नाहीत. 'क' जीवनसत्व रोगप्रतिकारक शक्ती वाढवतं. 'क' जीवनसत्वामुळे पचनशक्ती सुरळीतपणे पार पडते. 'क' जीवनसत्वामुळे शरीराला अँटी ऑक्सिडेंट पुरेशा प्रमाणात मिळतात. रक्तदाब नियंत्रणात येतं. तसेच रक्त वाहिन्यांवरील ताण कमी करण्यास मदत करतं. शरीरातील कॉलेस्ट्रॉल कमी करून हृदयासंबधित आजारांचा धोका कमी करतं. शरीरातील युरिक ॲसिड कमी करण्याचं काम 'क' जीवनसत्व करतं. तसंच गाठी असल्यास त्या कमी करण्यास मदत करतं. लोहाचं प्रमाण कमी असल्यास 'क' जीवनसत्वामुळे ती कमरता भरून निघते. तसंच अन्नपदार्थातून लोह शोषण्यास मदत करतं.

डाएट कसं असावं?

रोज आहारातून 'क' जीवनसत्व योग्य प्रमाणात पोटात जाणं गरजेचं आहे. यासाठी डाएट कसं असावं, याविषयी...

सकाळी (६-७ वाजण्याच्या दरम्यान) : गरम किंवा साध्या पाण्यात अर्धा/ एक लिंबू पिळून ते पाणी प्या.

नाश्ता(९-१० वाजण्याच्या दरम्यान) : नाश्त्याला एक पदाथासीबत (मूग डाळीचं घावन, इडली, डोसा, बाजरीची भाकरी यातील काहीही) सोबत एक अंड आणि एक प्लेट सलाड घ्या. कैरीची चटणी देखील खाऊ शकता.

मधल्या वेळेचा खाऊ

– उपलब्धतेनुसार कोणतंही एक फळ खाऊ शकता.

दुपारचं जेवण(१-२ वाजण्याच्या दरम्यान) : वरण भात, पोळी, एक वाटी पालेभाजी, एक प्लेट सलाड खाऊ शकता. तसंच कैरीच्या चटणीचाही समावेळ करा.

अल्पोपहार -

भाजलेले चणे आणि एक फळ खाऊ शकता.

रात्रीचे जेवण(८-९ वाजण्याच्या दरम्यान) : वरण भात, पोळी, भाजी आणि सलाड खावं.

वजन कमी करणाऱ्यांसाठी खास टीप

सलाड दिवसातून एकदा घेतलं तरीही पुरेसं आहे. सलाडमध्ये टोमॅटो, कांदा, गाजर, काकडी आणि अर्ध्या लिंबाचा रस असावा. यामुळे शरीराला 'क' जीवनसत्व मिळेल. ज्यांना वजन कमी करायचं आहे, त्यांनी रात्री किंवा दुपारच्या जेवणाआधी सलाड खावं. यामुळे शरीरातील कॅलरी कमी होतील आणि वजन कमी करायला मदत होईल.

कमतरता कशी ओळखाल?

वातावरणातील बदलामुळे तुम्ही आजारी पडत असाल तर ते 'क' जीवनसत्वाची कमतरता असल्याचं लक्षण आहे. म्हणजेच रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्याची गरज आहे. 'क' जीवनसत्वाची कमतरता खालील लक्षणांद्वारे ओळखू शकता.

महिन्यातून एक-दोन वेळा सर्दी-तापाचा त्रास होणं, थकवा जाणवणं, महिन्याभरात ३-४ किलो वजन अचानक कमी होणं, केसगळती, हिरड्या कमकुवत होणं, उच्च रक्तदाब, जखम लवकर न भरणं

जास्त सेवनामुळे होतील दुष्परिणाम

तसंच 'क' जीवनसत्वाचं जास्त प्रमाणात सेवन होणे देखील शरीराचं नुकसान करण्यास कारणीभूत ठरतं. 'क' जीवनसत्वाचं प्रमाण जास्त झाल्यास किडनी स्टोन, पोटात जळजळ, जुलाब अशी लक्षणं दिसून येतात.

– 'क' जीवनसत्व पाण्यात विरघळून जातं. त्यामुळे शरीरात साठत नाही. म्हणून दररोज शरीरात आवश्यक प्रमाणात 'क' जीवनसत्व जाणं गरजेचं आहे. प्रत्येक व्यक्तीला दररोज ६५-९० ग्रॅम 'क' जीवनसत्वाचं सेवन करणं आवश्यक आहे.

900 ग्रॅममध्ये किती प्रमाणात 'क' जीवनसत्व असतं?

– फळं आणि भाज्यांमधून 'क' जीवनसत्व पोटात जाणं गरजेचं आहे. आवळा हे 'क' जीवनसत्वाचा उत्तम स्रोत आहे.

– वरील डाएट प्लॅनचा अवलंब केल्यास आवश्यक तेवढं 'क' जीवनसत्व शरीराला मिळेल.

आवळा- ५०० ते ६०० एमजी (चार ते पाच आवळे), पेरु- २२० एमजी (एक मोठं किंवा दोन छोटी फळं) ,पालक- १३० एमजी, सिमला मिरची- १२५ एमजी (एक किंवा दोन), कीवी- ९३ एमजी (दोन किंवा तीन किवी), ब्रोकोली- ९० एमजी


फळभाज्यांचे करा सेवन

लिची- ७१.५ एमजी (दोन ते तीन लिची), स्ट्राऊट्स- ६० ते ८० एमजी, पपई- ६० एमजी, स्ट्रॉबेरी- ५९ एमजी, संत्र- ५५ एमजी, लिंबू- ५३ एमजी, अननस- ४७. ८ एमजी,डाळी- ३५ ते ४० एमजी, आंबा- ३५ एमजी, कैरी- २७. ७ एमजी, टोमॅटो- २५ एमजी, बटाटा- १९. ७ एमजी , जांभळं- १४. ३ एमजी (नऊ ते दहा जांभळं), कांदा- १३.७ एमजी

वयोमानानुसार 'क' जीवनसत्वाची आवश्यकता

जन्म ते ६ महिने- ४० एमजी, ७ ते १२ महीने- ५० एमजी, १ ते ३ वर्षं- १५ एमजी, ४ ते ८ वर्षं- २५ एमजी, ९ ते १३ वर्षं- ४५ एमजी, १४ ते १८ वर्षं (मुलं)- ७५ एमजी, १४ ते १८ वर्षं (मुली)- ६५ एमजी, १९ वर्षांपेक्षा जास्त (मुलं)- ९० एमजी, १९ वर्षांपेक्षा जास्त (मुली)- ७५ एमजी

कान दुखत आहे ? तर लसणाचे हे ५ उपाय करून बघा



कानात मळ साचणे, सर्दीमुळे कान दुखणे किंवा कोणत्याही प्रकाराचे एलर्जी किंवा संसर्ग होणं ही सामान्य बाब आहे, जे बऱ्याच लोकांना होते पण वेळीच उपचार न केल्याने हा त्रास वाढू शकतो. या पासून वाचण्यासाठी लसूण हा एक कारागार उपाय आहे. जाणून घेउया लसणाचे ५ उपाय, जे आपल्याला कानाच्या त्रासेतून मुक्ती मिळवून देतील.

१. लसणाच्या काही पाकळ्या घेऊन वाटून घ्या किंवा ठेचून घ्या. आता हे मिश्रण एका कापड्यात गुंडाळून आपल्या कानावर ठेवा. किमान अर्धातास या कापड्याला कानावर तसेच राहू द्या, नंतर काढून टाका. काही वेळातच आपण अनुभवाल की आपल्या कानाचं दुखणं नाहीसं झालं.

२. लसणाच्या पाकळ्या ठेचून घ्या कापड्यात गुंडाळून याचा रस थेट प्रभावित असलेल्या जागीस आणि ह्याला एका कानाच्या घाला. याम ुळे निवळ आपले कानाचे दुखणेच थांबत नाही तर संसर्ग देखील बरं होईल.

३. मोहरीच्या तेलात लसणाच्या काही पाकळ्या टाकून गरम करा. हे तेल कोमट झाल्यावर याच्या १ किंवा २ थेंब कानात टाकून कापूस लावून घ्या. लक्षात असू द्या की हे तेल जास्त गरम नको, नाही तर हे आपल्या पडद्याला इजा करूशकतो.

४. लसणाच्या काही पाकळ्या घेउन मीठाच्या पाण्यात उकळवून घ्या. गॅस वरून काढून समुद्री मीठ घालून बारीक करा किंवा ठेचून घ्या. आता या मिश्रणाला कापड्यात गुंडाळून कानाच्या त्या भागास ठेवा जिथे दुखत आहे किंवा संसर्ग झाले आहे.

५. लसणाला उकळून मिठासह वाटून घ्या आणि ही पेस्ट कानाला किंवा कानाच्या मागील बाजूस लावा. हे आपल्यास वेदने पासून आराम देईल.

काय आहे लेग स्ट्रेन?



चांगला खेळणारा एखादा खेळाडू टीममध्ये दिसत नाही तेव्हा तो आजारी का पडला, याबाबत चाहते जिज्ञासा दाखवतात. अशावेळी बरेचदा लेग स्ट्रेन (पायात लचक भरणे) हे कारण सांगितले जाते. खेळाडूंना असा त्रास उद्भवल्यास आपण समजू शकतो, कारण खेळताना केलेल्या हालचालींवरून त्यांना लेग स्ट्रेनला केव्हाही बळी पडावे लागू शकते. परंतु मैदानावर कधीही पाऊल न ठेवर्णाया लोकांनाही आता लेग स्ट्रेनचा त्रास उद्भवू लागला आहे. पायांच्या एखाा स्नायूवर मर्यादेपेक्षा जास्त ताण पडत असेल किंवा ते आकसतात, तेव्हा लेग स्ट्रेन असे म्हणतात. पायाच्या कोणत्याही स्नायूवर असा ताण पडू शकतो. विशेषतः मांड्यांमध्ये हॅम स्ट्रींग, क्वाड्रिसेप्स आणि ॲडक्टर हे बळकट स्नायूंचे तीन स्तर असतात.

सुरवातीच्या दोन स्नायूंवर ताण पडण्याची शक्यता अधिक असते. कारण हे स्नायू सोबत काम करतात आणि कंबरेमार्गे गुडघ्यातूनही जातात. लेग स्ट्रेन म्हणजेच पायात लचक भरल्यास स्नायू खूप दुखतात. तरीही विशिष्ट हालचाली कराव्या लागल्यास वेदना आणखी वाढतात. काही रुग्णांमध्ये सूज येते आणि चालण्यास खूप त्रास होतो.

कधीही व्यायाम न करणार्यांनी विशिष्ट हालचाली केल्यास किंवा जोर्यात धावणे,उडी मारणे अशा माफक हालचाली केल्यासही लेग स्ट्रेन उद्भवू शकतो. लेग स्ट्रेन झालेल्या पायावर वजन टाकण्याऐवजी काही दिवस आराम करायला हवा. सूज कमी करण्यासाठी विशिष्ट प्रकारचे बँडेज बांधावे. झोपताना पाय उंचीवर ठेवावा, असा त्रास उद्भवू नये म्हणून नियमित व्यायाम आणि योगासने करावीत.

आयव्हीएफ सारख्या उपचारात एग रिट्रीवलनंतरचे भयंकर साइड इफेक्ट्स

जेव्हा एखादी स्त्री नैसर्गिक पद्धतीने आई होऊ शकत नाही. तेव्हा इतर मार्गांनी गर्भधारणा करण्याचा प्रयत्न केला जातो. त्यापैकी एक एआरटी आहे. याच्या आत, अंडाशयातून ओवरीमधून अंडी गोळा केली जातात. या प्रक्रियेला एग रिट्रिवल असे म्हणतात आणि सामान्यतः IVF किंवा इतर प्रजनन उपचारांमध्ये वापरली जाते. एग रिट्रिवल ही पद्धत सामान्यतः सुरक्षित मानले जाते परंतु त्याचे काही दुष्परिणाम आहेत.

एग रिट्रिवलची प्रक्रिया – या लेखात आम्ही तुम्हाला एग रिट्रिवलचे काही दुष्परिणाम सांगत आहोत. stanfordchildrens.org नुसार, एग रिट्रिवरच्या जोखमींमध्ये वेदना, पेल्विक एरिया आणि अंडाशयात संसर्ग, आतड्याला दुखापत, मूत्राशय, गर्भाशय, अंडाशय किंवा प्रमुख रक्तवाहिन्या यांचा समावेश होतो. अल्ट्रासाऊंडच्या मदतीने प्रक्रिया केली जात असल्याने आणि अल्ट्रासाऊंडवर सुई दिसू शकत असल्याने, गंभीर समस्यांची शक्यता खूपच कमी आहे. mayoclinic.org नुसार, शेवटच्या इंजेक्शनच्या 34 ते 36 तासांनंतर आणि ओव्हुलेशनच्या आधी एग रिट्रिवल डॉक्टरांच्या क्लिनिकमध्ये केली जाऊ शकते.

पोटदुखी आणि पेटके – एग रिट्रिवलच्या सर्वात सामान्य दुष्परिणामांपैकी एक म्हणजे क्रॅम्पिंग आणि ओटीपोटात दुखणे. ही अस्वस्थता सामान्यतः अंडाशयापर्यंत जाण्यासाठी योनीच्या भिंतीतून सुई टाकावी लागते. प्रक्रिया सामान्य भूल किंवा एनेस्थीसियाचे औषध देऊन अंतर्गत केली जात. त्यामुळे प्रक्रियेदरम्यान महिलांना वेदना जाणवू नयेत. प्रक्रियेनंतर काही सौम्य ते मध्यम क्रॅम्पिंग आणि वेदना होऊ शकतात. ही अस्वस्थता कमी करण्यासाठी, ओव्हर-द-काउंटर वेदना कमी करणारे, जसे की ibuprofen किंवा Acetaminophen, वापरले जाऊ शकतात.



पोट फुगणे आणि सूज येणे – एक रिट्रिवरचा आणखी एक सामान्य दुष्परिणाम म्हणजे पोट फुगणे. हे प्रजननक्षमतेच्या औषधांसह अंडाशयांच्या उत्तेजनामुळे होते, ज्यामुळे अंडी मोठी होऊ शकतात. वाढलेली अंडाशय आसपासच्या अवयवांवर दबाव आणू शकते, ज्यामुळे सूज आणि अस्वस्थता येते. या दुष्परिणामापासून मुक्त होण्यासाठी, महिलांनी चांगले हायड्रेटेड राहावे, निरोगी आहार घ्यावा आणि जास्त मीठयुक्त पदार्थ टाळावेत. ते सैल-फिटिंग कपडे घालू शकतात आणि अस्वस्थता कमी करण्यासाठी हीटिंग पॅड किंवा गरम पाण्याची बाटली वापरू शकतात.

योगाने गर्भधारणेची शक्यता वाढेल

स्पॉटिंग आणि रक्तस्त्राव – स्पॉटिंग आणि रक्तस्त्राव हे देखील एग रिट्रिवरचे सामान्य दुष्परिणाम आहेत. हे डिम्बग्रंथि ाङ्ख''ा२ पंचर करण्यासाठी सुईच्या वापरामुळे आहे. ज्यामुळे थोड्या प्रमाणात रक्तस्त्राव होऊ शकतो. रक्तस्त्राव हलका किंवा जड असू शकतो आणि प्रक्रियेनंतर काही दिवस टिकू शकतो. हा दुष्परिणाम दुरुस्त करण्यासाठी, महिलांनी टॅम्पन्सऐवजी सॅनिटरी पॅड वापरावे. कारण टॅम्पन्समुळे संसगार्चा धोका वाढू शकतो. योनिमागार्ची भिंत बरी झाल्यानंतर त्यांनी किमान एक आठवडा लैंगिक संबंध टाळले पाहिजेत.

मळमळ आणि उलटी – काही महिलांना एग रिट्रिवरनंतर मळमळ आणि उलट्या होऊ शकतात. हे सहसा प्रक्रियेदरम्यान वापरल्या जाणाऱ्या ऍनेस्थेसियामुळे होते. जे पाचन तंत्रावर परिणाम करू शकते. हा दुष्परिणाम व्यवस्थापित करण्यासाठी, महिलांनी प्रक्रियेनंतर काही तास खाणे टाळावे आणि नंतर लहान, हलके जेवणाने सुरुवात करावी. त्यांनी भरपूर द्रव प्यावे आणि अल्कोहोल आणि कॅफिन टाळावे, ज्यामुळे मळमळ वाढू शकते.

कान टोचताना काय काळजी घ्याल



बाळाच्या जन्मानंतर हिंदू संस्कृतीत कान टोचण्याचाही विधी केला जातो. साधारण १२ व्या दिवशी कान टोचले जातात. बाळाची त्वचा अत्यंत मऊ असल्यामुळे त्याला अधिक त्रास होत नाही आणि कान पटकन टोचून होतात यासाठी हा विधी सहसा १२ दिवस ते महिन्याच्या आत केला जातो.

- **कानाचा टोचलेला भाग स्वच्छ ठेवा** – तुमच्या बालरोगतज्ज्ञांनी शिफारस केलेले सौम्य अँटीसेप्टिक सॉल्युशन वापरून दिवसातून २ वेळा कान टोचलेला भाग हळुवारपणे स्वच्छ करा. कानातले आणि आजूबाजूची त्वचा स्वच्छ करण्यासाठी कॉटन बॉल किंवा स्वच्छ, मऊ कापडाचाच वापर करावा.
- **कानातल्यांना हात नका लाऊ** – कानातल्यांना स्पर्श करणे टाळा किंवा घरातील इतर व्यक्तींनाही घाणेरड्या हातांनी बाळाच्या कानाला स्पर्श करू देऊ नका. संसर्ग टाळण्यासाठी कानाचा भाग शक्य तितका स्वच्छ ठेवणे महत्वाचे आहे.
- **कानातील रिंग हलक्या हातांनी फिरवा** – कान साफ केल्यानंतर, कानातल्या छिद्रांना चिकटू नये म्हणून काही वेळा काळजीपूर्वक आणि अगदी हलक्या हाताने फिरवा. हे कानातले त्वचेमध्ये रुतून बसणार नाहीत याची खात्री करून घ्या आणि बाळाला त्रास होत नाही ना हे तपासून घ्या. तसंच कान टोचणारे अथवा बालरोगतज्ज्ञ यांच्या सल्ल्यानुसार पहिले ६ आठवडे तरी हे कानातून काढू नका. यामुळे इन्फेक्शन होऊ शकते.
- **आंघोळ घालताना काळजी** – तुमच्या बाळाला आंघोळ घालताना, शँपू, साबण किंवा इतर कोणत्याही त्रासदायक गोष्टी कान टोचलेल्या भागाच्या संपर्कात येऊ नयेत याची काळजी घ्या. आंघोळीनंतर हळूवारपणे कान कोरडे करा. कुठेही घाई अथवा धसमुसळेपणा करू नका.
- **बाळांना कपडे घालताना** – तुमच्या बाळाला टोचलेल्या कानाला चोळण्यापासून रोखण्यासाठी सैल कपडे निवडा. घट्ट कपडे किंवा सामानामुळे चिडचिड किंवा अस्वस्थता येऊ शकते. तसंच कपडे घालताना हळूवारपणे घाला. त्याच्या कानात अडकणार नाहीत याची काळजी घ्या.

इन्फेक्शन कसे ओळखाल ?

लालसरपणा, सूज येणे, पू होणे किंवा जास्त वेदना यासारख्या संसर्गाच्या कोणत्याही लक्षणांवर नेहमी लक्ष ठेवा. आपल्याला संबंधित लक्षणे दिसल्यास, त्वरीत आपल्या बालरोगतज्ज्ञांशी संपर्क साधा. कानावर कोणताही दाब देऊ नका. तसंच बाळ सतत एकाच बाजूला कानावर झोपणार नाही याची काळजी घ्या. या सर्व गोष्टी नीट पाळल्या जातील याची काळजी घ्या.

उकाड्यामुळे शाळांचे वेळापत्रक बदलण्याची मागणी... दुपारच्या सत्रात शाळा नको

जून महिन्याचे १५ दिवस उलटून गेल्यानंतरही पावसाने राज्यातील बहुतांश भागाकडे पाठ फिरवली आहे. यामुळे ऊन आणि उकाड्याने विद्यार्थी आणि पालक हैराण झाले आहेत. त्यामुळे विद्यार्थी व पालकांकडून शाळांचे वेळापत्रक बदलण्याची मागणी होऊ लागली आहे.



■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

जून महिन्याचे १५ दिवस उलटून गेल्यानंतरही पावसाने राज्यातील बहुतांश भागाकडे पाठ फिरवली आहे. यामुळे ऊन आणि उकाड्याने विद्यार्थी आणि पालक हैराण झाले आहेत. त्यामुळे विद्यार्थी व पालकांकडून शाळांचे वेळापत्रक बदलण्याची मागणी होऊ लागली आहे. वाढत्या तापमानामुळे पुढील १५ दिवस दुपारच्या सत्रातील शाळा, सकाळच्या सत्रात भरवण्याची मागणी विविध शिक्षक संघटनांनी शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याकडे केली आहे.

विदर्भ वगळता राज्यभरातील शाळा १५ जूनपासून सुरू झाल्या आहेत. मात्र दुपारच्या सत्रात शाळांमध्ये जाणारे विद्यार्थी उन्हाच्या झळा आणि उकाड्याने हैराण होऊ लागले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. विशेषतः ग्रामीण भागांतील अनेक शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची कमतरता, अपुरा वीजपुरवठा तसेच लोखंडी पत्र्यांच्या वर्गखोल्यांमुळे विद्यार्थ्यांना अधिक त्रास सहन करावा लागत आहे.

विद्यार्थ्यांचे आरोग्य, सुरक्षितता लक्षात घेता शाळांच्या वेळापत्रकात तात्पुरते बदल करण्याची मागणी पालकांकडून होत आहे. पावसाळा सुरू होईपर्यंत सकाळच्या सत्राचा पर्याय स्वीकारावा, अशी मागणीही होत आहे.

गळ्यात कोंबडीच्या पायांची माळ घालून केला पालिकेचा निषेध!

अंबरनाथमध्ये पालिका जैविक कचरा उचलत नसल्याचा आरोप करत एका पठ्याने चांगलीच शक्कल लढवली आहे. सध्या हा विषय सोशल मीडियावर चर्चेचा विषय आहे.



■मुंबई । प्रतिनिधी,

गळ्यात कोंबडीच्या पायांची माळ घालून यश जंगले या त्रस्त अंबरनाथकराने पालिकेचा निषेध केला आहे. अंबरनाथमध्ये पालिका जैविक कचरा उचलत नसल्याचा आरोप यश जंगलेने केला आहे.

ही घटना भेंडीपाडा परिसरात चिकन विक्रेत्यांमुळे दुर्गंधी निर्माण होत असल्याचा आरोप केला आहे. अंबरनाथच्या भेंडीपाड्यात रस्त्याच्या बाजूला बस्तान मांडलेल्या अनधिकृत चिकन विक्रेत्यांमुळे परिसरात मोठी दुर्गंधी पसरली आहे. याकडे पालिका दुर्लक्ष करत असल्यानं एका तरुणानं थेट गळ्यात कोंबडीच्या पायांची माळ आणि पिशवीत जैविक कचरा घेऊन पालिकेत प्रवेश केला. यामुळे एकच खळबळ उडाली.

यश जगले असं या तरुणाचं नाव असून तो अंबरनाथच्या नवीन भेंडीपाड्यात राहतो. या परिसरातील अनधिकृत चिकन विक्रेते त्यांचा जैविक कचरा थेट नाल्यात टाकून देतात. हा कचरा अंबरनाथ नगरपालिका उचलत नाही. त्यामुळे या परिसरात मोठी दुर्गंधी पसरते. याबाबत यश जगले याने अनेकदा अंबरनाथ नगरपालिकेत तोंडी आणि लेखी तक्रारी केल्या, मात्र त्याकडे पालिका प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा त्याचा आरोप आहे. त्यामुळेच आज सकाळी तो गळ्यात कोंबडीच्या पायांची माळ आणि पिशवीत चिकन वाल्यांचा जैविक कचरा घेऊन पालिकेत आला आणि थेट मुख्याधिकाऱ्यांच्या केबिन बाहेरच हा कचरा काढून ठेवला. त्यामुळे पालिकेत मोठी दुर्गंधी पसरली. जर पालिका स्वच्छ आहे, तर आम्ही दुर्गंधीत का राहावं? पालिकेच्या अधिकाऱ्यांनाही आम्ही कशा परिस्थितीत राहतो ते कळावं, म्हणून आपण हा प्रकार केल्याचं यश जगलेने सांगितलं.

यश जंगलेने नेमकं काय केलं?

तुम्ही प्रत्येक वेळी का तुमच्या साहेब थांबतच असतात का? एक महिन्यापासून मी चक्रा मारतोय साहेब मी कसा घाणीत राहू सांगा. एवढे वेळा मी तक्रार केली मला सांगा मी कसा राहू या घाण वासामध्ये? महिनाभर मी तक्रार करतोय, मला मुख्य अधिकारी भेटतच नाहीत. याच्यामध्ये मी पुन्हा दिवसभर राहतोय? तुम्ही पण हा त्रास सहन करुन बघा. तुम्ही पण हा त्रास महिनाभर सहन करा. गोण्याच्या गोण्या तिकडे फेकलेले असतात हे काय आहे हे बघा हे काय आहे? हे आता जे फोटो अर्धा एक तास अगोदरचे तुमच्याकडे स्वच्छता किती स्वच्छता आहे तुमच्याकडे फोटो दाखवत यश जंगलेने व्यथा मांडली.

मिरा-भाईंदरमधील नालेसफाईच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह



■भाईंदर। प्रतिनिधी,

दरवर्षीप्रमाणे यंदाही पावसाळ्यापूर्वी मिरा -भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नालेसफाई केली जात आहे. सुमारे 79 किलोमीटर क्षेत्रात पसरलेल्या मिरा -भाईंदर शहरात जवळपास 200 लहान-मोठे आणि कच्चे-पक्के नाले आहेत. या नाल्यांच्या सफाईसाठी तब्बल 4 कोटी रुपये खर्च करण्यात आले असून, 17 एप्रिलपासून ते जूनच्या दुर्सया आठवड्यापर्यंत शहरातील बहुतांश नाल्यांची सफाई पूर्ण झाल्याचा दावा मनपाच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने केला आहे. मात्र, वस्तुस्थिती काही वेगळीच असून नालेसफाई पूर्ण केली नसल्यामुळे यंदाही पावसाळ्यात शहर तुंबण्याची भीती नागरिकांमधून व्यक्त केली जात आहे.

आतापर्यंत काही नाल्यांना हात सुद्धा लावलेला नाही त्यामुळे कर्चयाचा बोळा तसाच अजूनही पडून आहे. त्या भ्रष्ट नालेसफाईची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी नगरसेवकांनी केली आहे. गेल्या वर्षी ज्या मे. आशापुरा कन्स्ट्रक्शन कंपनीला नालेसफाईचे कंत्राट देण्यात आले होते, त्याच कंपनीच्या कामावर गेल्या पावसाळ्यात गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. गेल्या वर्षी शहर पाण्यात बुडाले असतानाही, महापालिका महासभेने नवीन टेंडर न-काढता 27 मार्च रोजी महासभा ठराव क्रमांक 32 अन्वये याच कंपनीला मुदतवाढ दिली. एखाद्या कंपनीचे काम उत्कृष्ट आणि समाधानकारक असेल तर मुदतवाढ देणे समजण्यासारखे आहे. मात्र, गेल्या वर्षी शहर बुडवर्णाया कंपनीला काळ्या यादीत टाकण्याऐवजी पुन्हा मेहेरबानी का दाखवण्यात आली? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. गेल्या वर्षीप्रमाणेच यंदाही गटार आणि नाल्यांच्या सफाईमध्ये मोठ्या प्रमाणात त्रुटी दिसून येत आहेत. शहरातील काशिमीरा, इंद्रलोक, नवघर, मीरा रोड अशा अनेक ठिकाणी नालेसफाई पूर्णपणे झाली नसल्याचे सांगितले जात आहे. अनेक ठिकाणी गटाराच्या जाळीदार झाकणांजवळ उभे राहिल्यास, सफाई न झाल्यामुळे येर्णाया प्रचंड दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. असे असतानाही, लोकप्रतिनिधींनी नालेसफाईची पाहणी करत सोशल मीडियावर फोटो सेशनचा कार्यक्रम चोख पार पाडला आहे. जर यंदाच्या पावसाळ्यातही मिरा -भाईंदर शहर पाण्यात बुडाले, तर या भ्रष्ट अधिकारी आणि कंत्राटदाराच्या सिंडिकेटवर दंडात्मक किंवा फौजदारी कारवाई होणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

"मिरा -भाईंदर महानगरपालिका हद्दीत काही नाल्यांमधील गाळ मान्सूनपूर्व काढून साफसफाई झालेली नसल्याची माहिती प्राप्त झाली आहे. त्या अनुषंगाने स्वतः स्थळ पाहणी करून राहिलेल्या नाल्यातील गाळ काढण्याचे निर्देश त्या ठेकेदाराला देण्यात येतील व त्यावर कारवाई सुद्धा करण्यात येईल."

-डॉ. सचिन बांगर, उपायुक्त, घनकचरा

"मिरा भाईंदर शहरात प्रत्यक्षात नाले व गटारे स्वच्छ न-करता फक्त फोटो काढून, फोटो सेशन केले आहे. ही बाब अत्यंत चुकीची असून वास्तविक काम न-करता केवळ प्रसिद्धीसाठी नागरिकांच्या आरोग्याची खेळणे हे पालिका व ठेकेदाराकडून चुकीचे आहे. जर नालेसफाई झालीच नाही तर, पावसामुळे गटारे तुंबल्यामुळे पावसाळ्यात दुर्गंधी होऊन डासांचा प्रादुर्भाव वाढवून रोगराई पसरण्याचा धोका असतो. यासाठी ठेकेदार नालेसफाई करत आहे की हातसफाई करत आहे, हे पालिकेने तात्काळ पाहणी करून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करून त्यांना काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करावी."

-सजी आयपी, नागरिक"

कौटुंबिक वाटणीची जमीन मोजणी २०० रुपयांत...

मोजणीसाठी ९० व ३० दिवसांची नवी कालमर्यादा

राज्य शासनाने जमीन मोजणीच्या शुल्क व वर्गीकरणात मोठे बदल करत सर्वसामान्यांना दिलासा दिला आहे. आता कुटुंबातच झालेल्या वाटणीची मोजणी करावयाची असल्यास ती अवघ्या २०० रुपयांत होईल, तर नियमित मोजणी ९० दिवसांत आणि द्रुतगती मोजणी ३० दिवसांत पूर्ण करणे बंधनकारक करण्यात आले आहे.



■मुंबई। प्रतिनिधी,

राज्य शासनाने जमीन मोजणीच्या शुल्क व वर्गीकरणात मोठे बदल करत सर्वसामान्यांना दिलासा दिला आहे. आता कुटुंबातच झालेल्या वाटणीची मोजणी करावयाची असल्यास ती अवघ्या २०० रुपयांत होईल, तर नियमित मोजणी ९० दिवसांत आणि द्रुतगती मोजणी ३० दिवसांत पूर्ण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या नव्या कालमर्यादेमुळे जमीन मोजणीच्या कामाला गती मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, यामुळे मोजणी प्रक्रियेतील उशीर आणि भ्रष्टाचाराला पूर्णपणे आळा बसेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या निर्णयानुसार, ग्रामीण भागात २ हेक्टरपर्यंत नियमित मोजणीसाठी २,००० रुपये, तर शहरी भागात १ हेक्टरपर्यंत ३,००० रुपये शुल्क निश्चित करण्यात आले आहे.

कौटुंबिक वाटप किंवा संमतीने होणाऱ्या मोजणीसाठी प्रति पोटहिस्सा अवघे २०० रुपये शुल्क आकारले जाईल. ग्रामीण भागात २ हेक्टरपर्यंत नियमित मोजणीसाठी २,००० रुपये, तर द्रुतगती मोजणीसाठी ८,००० रुपये शुल्क द्यावे लागेल. शहरी भागात १ हेक्टरपर्यंत नियमित मोजणीसाठी ३,००० रुपये, तर द्रुतगती मोजणीसाठी १२,००० रुपये शुल्क निश्चित करण्यात आले आहे.

मोजणी दिवशी गैरहजर राहिल्यास आर्थिक फटका

या नवीन नियमांनुसार अर्जदार मोजणीच्या दिवशी गैरहजर राहिल्यास त्याला मोठा आर्थिक फटका बसू शकतो. अशावेळी मूळ शुल्काच्या ५० टक्के किंवा कमाल १०,००० रुपये इतके पुनर्भेट शुल्क आकारले जाईल. मात्र, मोजणीच्या दिवशी स्वतः भूमापक अधिकारी अनुपस्थित राहिल्यास अर्जदाराला कोणतेही पुनर्भेट शुल्क भरावे लागणार नाही, अशी दिलासादायक तरतूदही करण्यात आली आहे.

मोजणी दरांमध्ये सरकारी संस्थांना मोठी सवलत

महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियमांतर्गत येणाऱ्या भूखंडांच्या मोजणीसाठी यापुढे दीडपट शुल्क आकारले जाईल. तसेच, कनिष्ठ भूमापकाच्या मोजणीवर आक्षेप असल्यास त्याच्या उच्च तपासणीसाठी ३ ते ५ पट अधिक शुल्क द्यावे लागेल. या मोजणी दरांमध्ये सरकारी संस्थांना मोठी सवलत देण्यात आली असून निमशासकीय संस्थांना मोजणी दरात ५० टक्के, तर पूर्णतः शासकीय जमिनींच्या मोजणीसाठी ७५ टक्के सवलत मिळेल, असेही सांगण्यात आले आहे.

आधी आईचा जळून मृत्यू, नंतर चिमुरडा नाल्यात बुडाला... एकाच दिवशी काय घडलं?

या संपूर्ण घटनेतील सर्वात वेदनादायी आणि चक्रावून टाकणारी बाब म्हणजे, ज्या दिवशी निष्पाप वंशचा नाल्यात पडून मृत्यू झाला, त्याच दिवशी नागपूरच्या रुग्णालयात मृत्यूशी झुंज देणाऱ्या त्याची आई केता सूर्यवंशी यांनीही अखेरचा श्वास घेतला. एकाच दिवशी वेगवेगळ्या ठिकाणी घडलेल्या या दोन मृत्यूंमुळे सूर्यवंशी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. याप्रकरणी बल्लारपूर पोलिसांनी तूर्तास आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून, पोलीस या दोन्ही घटनांचा सखोल तपास करत आहेत. स्वयंपाक करताना केता यांना आग कशी लागली आणि वंश नाल्यापर्यंत कसा पोहोचला, यामागे काही घातपात तर नाही ना, या अँगलनेही पोलीस तपास करत आहेत.



■चंद्रपूर। प्रतिनिधी,

चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर शहरातून एक अतिशय हृदयद्रावक आणि धक्कादायक घटना समोर आली आहे. दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये आई आणि तिच्या अवघ्या आठ वर्षाच्या मुलाचा एकाच दिवशी मृत्यू झाला आहे. या दुदैर्वी आणि संशयास्पद घटनेमुळे संपूर्ण परिसरात तीव्र शोककळा पसरली असून स्थानिक नागरिकांकडून हळहळ व्यक्त होत आहे. केता दीपक सूर्यवंशी (30) आणि वंश दीपक सूर्यवंशी (8) अशी मृत आई व मुलाची नावे आहेत.

आई गंभीररीत्या भाजली

मिळालेल्या माहितीनुसार, बल्लारपूर येथील रहिवासी असलेल्या केता सूर्यवंशी या 8 जून रोजी घरात स्वयंपाक करत असताना अचानक लागलेल्या आगीत गंभीररीत्या भाजल्या होत्या. त्यांची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याने त्यांना तातडीने बल्लारपूरच्या ग्रामीण रुग्णालयात आणि त्यानंतर जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, प्रकृतीत सुधारणा न झाल्याने पुढील उपचारासाठी त्यांना नागपूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तिथे डॉक्टर त्यांचे प्राण वाचवण्यासाठी शथीर्चे प्रयत्न करत होते. आई रुग्णालयात उपचार घेत असताना, 8 वर्षांचा चिमुरडा वंश हा त्याचे आजोबा शीतल सूर्यवंशी यांच्यासोबत घरी राहत होता.

चिमुरड्याचा नाल्यात पडून मृत्यू

दरम्यान, शनिवारी सकाळी 11 वाजण्याच्या सुमारास वंश अचानक घरातून बाहेर पडला आणि बेपत्ता झाला. बराच शोध घेऊनही त्याचा कुठेच पत्ता न लागल्याने आणि तो सायंकाळपर्यंत घरी न परतल्याने हताश झालेल्या आजोबांनी पोलिसांत तो हरविल्याची तक्रार नोंदवली. दुसऱ्या दिवशी सकाळी एका शेजाऱ्याने वंश सापडल्याची माहिती दिली, मात्र पाठोपाठ त्याचा मृतदेह सापडल्याचे समजताच आजोबांच्या पायाखालची जमीनच सरकली. घराच्या जवळच असलेल्या एका नाल्यामध्ये वंशचा मृतदेह तरंगताना आढळून आला. खेळता खेळता पाय घसरून नाल्यात पडल्याने त्याचा बुडून मृत्यू झाला असावा, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

नाशिक-मुंबई हायवेवर सिनेस्टाईल थरार

उत्पादन शुल्क विभागानं सापळा रचून जप्त केला कोट्यवधींचा अवैध मुद्देमाल



■भिवंडी। प्रतिनिधी,

इलेक्ट्रॉनिक साहित्याच्या नावाखाली गोव्यातून महाराष्ट्रात कर चुकवून आणल्या जाणाऱ्या विदेशी दारू तस्करीचा राज्य उत्पादन शुल्क विभागाने मोठा पदार्फाश केला आहे. भिवंडी उत्पादन शुल्क विभाग अर्था उत्पादन शुल्क विभाग आणि कल्याण भरारी पथकाने संयुक्त कारवाई करत नाशिक-मुंबई महामार्गावर सापळा रचून कोट्यवधींचा दारूसाठा जप्त केला. सदर कारवाईमध्ये बिल इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे दाखवण्यात आले असले तरीही प्रत्यक्षात कंटेनरमध्ये विदेशी दारूचे तब्बल 1620 बॉक्स आढळल्याचं पाहायला मिळालं.

कारवाईचा सिनेस्टाईल थरार...

गोव्यातून महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात कर चुकवून विदेशी मद्याची तस्करी होत असल्याची गोपनीय माहिती एउक्एए विभागाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे भिवंडी उत्पादन शुल्क विभाग आणि कल्याण भरारी पथकाच्या अधिकाऱ्यांनी नाशिक-मुंबई महामहामार्गावर सापळा रचला.

संशयित कंटेनर दिसताच त्याचा पाठलाग करून तो अडवण्यात आला. चालकाने इलेक्ट्रॉनिक साहित्याची वाहतूक करत असल्याचे सांगून कागदपत्रेही दाखवली. कागदपत्रांवरही इलेक्ट्रॉनिक मालाचा उल्लेख होता. मात्र अधिकाऱ्यांना संशय आल्याने कंटेनरची प्रत्यक्ष झडती घेतली असता, आत विदेशी मद्याचा मोठा साठा लपवून ठेवल्याचे उघड झाले.

उत्पादन शुल्काच्या या कारवाईत 1620 बॉक्स विदेशी दारू आणि तस्करीसाठी वापरण्यात आलेला कंटेनर असा एकूण 1 कोटी 20 लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली असून त्याची कसून चौकशी सुरू आहे. या रॅकेटमध्ये आणखी कोण-कोण सामील आहे, याचा तपास उत्पादन शुल्क विभाग करत आहे.

गोव्यात दारू स्वस्त असल्याने तेथून महाराष्ट्रात कर चुकवून तस्करी करण्याचे प्रकार गेल्या काही दिवसांपासून वाढले आहेत. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या या धडक कारवाईमुळे तस्करांमध्ये सध्या एकच खळबळ उडाली आहे. सणासुदीच्या काळात अवैध दारूचा पुरवठा करणाऱ्या टोळ्यांवर आणखी कडक कारवाई केली जाणार असल्याचे उत्पादन शुल्क विभागाने स्पष्ट केले आहे.

गोव्यातून अवैधरित्या मद्यसाठा महाराष्ट्रात आणला जात असल्याच्या अनेक घटना मागील काही महिन्यांमध्ये पाहायला मिळाल्या आहेत राज्यातील अनेक प्रवेश मार्गावर अशा घटनांवर यंत्रणांचीही करडी नजर आहे. मात्र, काही सराईत गुन्हेगार मोठा बनाव रचत अवैधरित्या मद्यसाठा राज्यात आणत आहेत, ज्यामुळं आता उत्पादन शुल्क विभागानं कारवाई आणखी कठोर केल्याचं पाहायला मिळत आहे.

भाईंदरमध्ये नोकराकडून 4.65 लाखांच्या दागिन्यांची चोरी

■भाईंदर। प्रतिनिधी,

मालकाने पॉलिश करण्यासाठी विश्वासाने दिलेले तब्बल 4 लाख 65 हजार रुपये किमतीचे सोन्याचे आणि हिंयाचे दागिने घेऊन एका नोकराने पोबारा केल्याची घटना भाईंदर पूर्व परिसरात घडली आहे. या प्रकरणी नवघर पोलीस ठाण्यात आरोपी नोकरा विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. तक्रारीनुसार, मिरारोड येथील रहिवासी आणि व्यावसायिक प्रशांत तारक सिल (वय 51 वर्षे) यांचे भाईंदर पूर्व येथील नवघर रोडवरील स्नेहा हॉस्पिटल जवळ जय त्रिमुर्ती ज्वेलर्स नावाचे दुकान आहे. प्रशांत सिल यांनी त्यांच्या दुकानात काम करणारा नोकर तपोस दास (वय 45 वर्षे) याच्याकडे सोन्याचे दागिने पॉलिश करण्यासाठी दिले होते. मात्र, तपोस दास याने मालकाचा विश्वासघात करून, लबाडीच्या इराद्याने हे दागिने चोरले आणि तो दुकानातून पसार झाला. आरोपी नोकराने दुकानातून एकूण 40.500 ग्रॅम वजनाचे सोने आणि डायमंड असा एकूण 4,65,000 रुपयांचा मुद्देमाल चोरला आहे. यामध्ये 3 लाख 50 हजार रुपये किमतीच्या 35 ग्रॅम वजनाच्या दोन सोन्याच्या बांगड्या (18 कॅरेट), 65 हजार रुपये किमतीचे 5.500 ग्रॅम वजनाचे तीन जोडी कानातील सोन्याचे जोड (22 कॅरेट) व 50 हजार रुपये किमतीचे पाच पीस लेब्रोग्रोन पीस डायमंड या दागिन्यांचा समावेश आहे. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर प्रशांत सिल यांनी नवघर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या तक्रारीवरून नवघर पोलिसांनी आरोपी तपोस दास विरोधात गुन्हा दाखल केला आहे. नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुकुंद यादव यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी अमोल तळेकर या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

मिरारोडमध्ये भरदिवसा घरफोडी... काशिमीरा पोलीसांनी दोघांना अटक केली

■भाईंदर। प्रतिनिधी,

घर बंद असल्याचा फायदा उठवत अज्ञात चोरट्याने कपाटातील तिजोरी उघडून तब्बल 45 लाख 19 हजार 260 रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची धक्कादायक घटना मिरा रोड पूर्व येथील पूनम क्लस्टर भागात घडली आहे. याप्रकरणी काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत दोन आरोपींना अटक केली आहे.

मिरारोडच्या पूनम क्लस्टर - 2 मधील बिल्डिंग नं. 2 च्या फ्लॅट क्रं. 507 मध्ये तक्रारदार शमा अफरोज तारीख सय्यद (वय 49 वर्ष) यांच्या घरात 11 जून रोजी संध्याकाळी 6 ते 13 मे रोजी संध्याकाळी 5 वाजेपर्यंत त्या कामानिमित्त बाहेर गेल्या असताना ही चोरी झाली. अज्ञात चोरट्याने त्यांच्या बंद घराचे दरवाजाचे लॉक कोणत्यातरी साधनाने उचकटून उघडले आणि घरात प्रवेश केला. त्यानंतर चोरट्याने कपाटातील चावीचा शोध घेऊन तिजोरी उघडली. त्या तिजोरीतून तब्बल 317.10 ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने ज्याची बाजारभावाप्रमाणे किंमत 44 लाख 39260 रुपये व 80 हजार रुपयांची रोकड, असा एकूण 45 लाख 19260रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. आपल्या घरात घरफोडी झाल्याचे लक्षात येताच तक्रारदार यांनी काशिमीरा पोलीस ठाण्यात तक्रार दिली, पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा दाखल केला. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तपास करून अवघ्या काही तासांतच दोन आरोपींना निष्पन्न करून अटक केली. आरोपी तसनिम मुसाजी सौदागर (वय 46 वर्षे) व अली असगर मुसाजी सौदागर (वय 24 वर्षे) या दोन आरोपींना अटक केली आहे. या गुन्ह्याचा अधिक तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शिवाजी खाडे करत आहेत.



विरार पूर्वमध्ये दिवसाढवळ्या घरफोडी... साडेपाच लाखांचा ऐवज लंपास

■वसई। प्रतिनिधी,

विरार पूर्व येथील एका ज्येष्ठ नागरिकाच्या घरात दिवसाढवळ्या घरफोडी करून अज्ञात चोरट्याने रोख रक्कम आणि सोन्या-चांदीचे दागिने असा तब्बल 5 लाख 91 हजार 100 रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी विरार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विरार पूर्व येथील तपोवन कॉम्प्लेक्समधील अहिल्या सोसायटीत राहणारे निवृत्त शिक्षक रविंद्र गजानन राऊत (71) यांच्या घरात ही चोरी झाली. 15 जून रोजी सकाळी 10.45 ते दुपारी 12.20 वाजण्याच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला.घरात शिरल्यानंतर चोरट्याने बेडरूममधील लोखंडी कपाटाचे लॉक तोडले आणि त्यामध्ये ठेवलेली रोख रक्कम तसेच सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले. चोरी झालेल्या ऐवजात सुमारे 80 हजार रुपयांची रोख रक्कम, सोन्याची चैन, अंगठ्या, मंगळसूत्र, सोन्याचे बिस्कीट, तसेच चांदीच्या विविध वस्तूंचा समावेश आहे.

घटनेची माहिती मिळताच विरार पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. सहाय्यक पोलीस आयुक्त बजरंग देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुरेश गावकवाड, उपनिरीक्षक मच्छिंद्र पंडित आणि तपास पथकाने तपास सुरू केला आहे.

दिवसाढवळ्या झालेल्या या घरफोडीमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून अज्ञात आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून सीसीटीव्ही फुटेज आणि इतर तांत्रिक पुराव्यांची तपासणी सुरू आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com